जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरातील वाडियापार्क मैदानातील जागतिक दर्जाच्या सोयीसुविधांच्या कामाचे २० फेब्रुवारी रोजी भूमिपूजन

### ऐतिहासिक वाडियापार्कचे रूपडं पालटणार; खेळाडूंची लवकरच स्वप्नपूर्ती : आ.संग्राम जगताप

नगर – अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक वाडियापार्क मैदानाच्या विकासासाठी व अत्याधुनिक सोयीसुविधांसाठी राज्यातील महायुती शासनाने ५३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून त्यास यश आले असून मजूर निधीचा १५ कोटींचा पहिला टप्पा प्राप्त झाला आहे. या निधीतून वाडियापार्क येथे होणाऱ्या विकास कामांचे भूमिपूजन २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते होणार आहे. नगरच्या सर्व खेळाडूंचे स्वप्न आता लवकरच साकार होणार आहे. खेळाडूंना लवकरच वाडियापार्क येथे जागतिक दर्जाच्या सर्व दर्जेदार सुविधा मिळणार आहेत, अशी माहिती आ.संग्राम जगताप यांनी दिली.

या कार्यक्रमाला डॉ.सुजय विखे, आ.संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, राज्याचे क्रीडा व युवक सेवाचे उपसंचालक युवराज नाईक आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी दिली. या कार्यक्रमास सर्व नागरिकांनी, पदाधिकारी, क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी व शहरातील खेळाडू उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, वाडियापार्क मैदानाच्या विकासामुळे नगरच्या खेळाडूंना सरावासाठी व स्पर्धांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत. अत्याधुनिक धावपट्टी, प्रकाशयोजना, प्रेक्षक गॅलरी, खेळाडूंसाठी स्वतंत्र कक्ष, स्वच्छतागृहे व इतर पूरक सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे जिल्हा, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करण्यास चालना मिळेल. नगरच्या सर्व खेळाडूंचे स्वप्न आता साकार होण्याच्या मार्गावर असून, वाडियापार्क लवकरच आधुनिक क्रीडा संकुलाच्या रूपात उभे राहणार आहे. ही बाब शहरासाठी अभिमानाची व सर्वांसाठी आनंदाची वार्ता असल्याचे आ. जगताप यांनी नमूद केले.

क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांनी सांगितले, आ.संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून वाडिया पार्क येथे होणाऱ्या जागतिक दर्जाच्या कामांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. जागतिक दर्जाचा ट्रॅक, मान्यताप्राप्त १५ मिमी. जाडीचा ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक ८ लेनसह उभारण्यात येणार आहे. क्रिकेट मैदानासाठी अत्याधुनिक खेळपट्टी, फ्रेश गार्डन सॉइल आणि फार्मयार्ड मॅन्युअर वापरून दर्जेदार लॉन विकसित केले जाईल. ऑटोमॅटिक स्प्रिंकलर सिस्टीम यामध्ये स्टेडियमच्या देखभालीसाठी २० एच. पी.च्या मोटारसह आधुनिक पॉपअप स्प्रिंकलर सिस्टीम बसवण्यात येईल. बॉल गेम डोम रूफ यामध्ये बास्केटबॉल आणि व्हॉलीबॉल मैदानावर स्ट्रक्चरल स्टील आणि कलर कोटेड शीट वापरून मजबूत 'डोम रूफ' उभारले जाईल. तसेच कबड्डीचे दोन व खो-खो च्या दोन मैदानांचे अद्ययावत बांधकाम करून त्यावरही डोम रूफची सोय केली जाणार आहे. आदि अड्यावर सोयीसुविधांचा सामेश आहे.

## कॉलेजच्या गेटजवळून मारुती कारची चोरी

नगर – शहरातील नगर कॉलेजच्या गेटच्या जवळ असलेल्या चायनिजच्या दुकानाशेजारी महावितरण कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या गॅरेज जवळ उभी केलेली मारुती कंपनीची वॅगनर कार (क्र. एमएच १२ एच एफ ०७७०) ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत वैभव गुलाब घोरपडे (वय ३१, रा. कौठीची तालीम, शेजारी माळीवाडा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## वांबोरी घाटात मृतदेह आढळलेल्या तरुणाची ओळख अखेर पटली

### हातावरील आणि छातीवरील टॅटू ठरला महत्वाचा दुवा, आता मारेकऱ्याचा शोध सुरु

नगर – नगर तालुक्यातील डोंगरगण गावच्या शिवारात असलेल्या वांबोरी घाटात दरी मध्ये १७ फेब्रुवारीला सकाळी ११ च्या सुमारास प्लास्टिकच्या गोणी मध्ये मृतदेह आढळलेल्या तरुणाची ओळख पटविण्यात आणि त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. किरण शिवाजी कावणे (वय ३२, रा. टाकळीमिया, ता. राहुरी) असे या मयत तरुणाचे नाव आहे. त्याच्या हातावर आणि छातीवर असलेल्या टॅटू यासाठी महत्वाचा दुवा ठरला आहे.

वांबोरी घाटात दरी मध्ये १७ फेब्रुवारीला सकाळी ११ च्या सुमारास प्लास्टिकच्या गोणीमध्ये एकाचा मृतदेह आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात त्याचा खुन झाल्याचे स्पष्ट झाल्यावर पो.कॉ. ज्ञानेश्वर तांदळे यांच्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या मृतदेहाची ओळख पटवणे हे सुरुवातीला पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आणि मृतदेहाचे वर्णन सर्व पोलिस ठाण्यांसह सोशल मिडीयावर प्रसारित केले.

सदर मृतदेहाच्या उजव्या हाताच्या मनगटावर 'छत्रपती' असे गोंदलेले (टॅटू) आणि छातीवर 'सोनाली' असे नाव गोंदलेले होते. ही माहिती सर्वत्र पसरल्यानंतर मयत किरण कावणे याच्या एका मित्राने ती वाचून पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी तात्काळ टाकळीमिया येथे जावून त्याच्या नातेवाईकांना मृतदेहाचे फोटो दाखवले. ते नातेवाईकांनी ओळखले. त्यानंतर पोलिस १८ फेब्रुवारीला सायंकाळी नातेवाईकांना घेवून नगरला जिल्हा रुग्णालयात आले. तेथे मृतदेह दाखवला तो ही नातेवाईकांनी ओळखत हा किरण कावणे असल्याचे सांगितले. पोलिसांनी सर्व कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे. नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीनुसार मयत किरण हा शेती आणि पोल्ट्री फार्मचा व्यवसाय करत होता. तो १४ फेब्रुवारी पासून घरून बेपत्ता झाला होता. त्याचा १७ फेब्रुवारीला वांबोरी घाटात मृतदेह आढळून आला होता. त्याचा खुन कोणी आणि कोणत्या कारणासाठी केला याचा पोलिसांनी कसून शोध सुरु केला असून लवकरच आरोपींना बेड्या ठोकू असे स.पो.नि. माणिक चौधरी यांनी सांगितले.

## दिल्लीगेट येथील बस आणि रिक्षा स्टॉप पूर्ववत करावा अन्यथा आंदोलन करणार

नगर – महानगरपालिकेच्या जागेतील दिल्ली गेट मुकुंद टेलर कॉर्नर येथील मनपाचा अधिकृत बस थांबा आणि रिक्षा स्टॉप असून येथे पूर्णपणे अतिक्रमण करण्यात आलेले असून फुटपाथही या अतिक्रमणात ठेवण्यात आलेले नाहीत, जेथे महावितरणची डीपी आहे तेथे रिक्षा थांबा होता तो महानगरपालिकेने पुर्ववत करुन येथील झालेले अतिक्रमण त्वरित काढावे अन्यथा अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने १५ दिवसांनी महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पत्रकाद्वारे महानगरपालिका प्रशासनास देण्यात आला आहे. या आंदोलनाची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची असेल असेही अध्यक्ष, अविनाश घुले यांनी पत्रकात म्हटले आहे.

## भिंगारच्या सैनिकनगरमध्ये बंद घर फोडून चोरी

### रोकडसह चांदीची नाणी असा ऐवज लंपास

नगर – भिंगार शहरातील सैनिकनगर परिसरात भरदिवसा घरफोडी झाल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत रोख रकमेसह चांदीची नाणी आणि साहित्य लंपास केले आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विशाल कुमार उपेन्द्र सिंह (वय ३०) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सैनिकनगर येथील सागर अपार्टमेंटमध्ये वास्तव्यास आहेत. २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेपासून ते २९ जानेवारी रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान त्यांचे घर बंद असताना ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील ४५०० रुपये रोख, ३००० रुपये किमतीची २५ ग्रॅम वजनाची चांदीची नाणी आणि ५०० रुपयांचा स्पिकर असा एकूण ८००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. विशाल कुमार सिंह यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(३)(४) आणि ३०५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. शाहीद शेख करत आहेत.

## केडगावमध्ये तरुणावर चाकू आणि बेल्टने हल्ला; जुन्या वादातून घडला प्रकार, ९ जणांवर गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरातील लिंक रोडवर जुन्या वादातून एका २१ वर्षीय तरुणाला बेल्ट बेदम मारहाण करत चाकूने हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात ९ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

केडगाव येथील दूध सागर सोसायटीत राहणारा रोहित संदीप बनसोडे हा तरुण १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास लिंक रोडवरील कारमेल स्कूलच्या पाठीमागे उभा होता. यावेळी पूर्ववैमनस्यातून हर्षल भंडारी, अजय ढवळे, मिलिंद वर्मा, आतिश उरमुडे, महेश होले, समीर शेख आणि त्यांच्यासोबत असलेल्या तीन अनोळखी इसमांनी रोहितला गाठले. जुन्या भांडणाच्या कारणावरून या आरोपींनी रोहितला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

यावेळी संशयितांनी आपल्याजवळील बेल्ट आणि चाकूचा वापर करून रोहितच्या खांद्यावर व पाठीवर वार केले. गंभीर दुखापत करून आरोपींनी त्याला जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केली. जखमी अवस्थेत रोहितने मित्राला फोन करून माहिती दिली. त्याने घटनास्थळी धाव घेत रोहितला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्याने १८ फेब्रुवारी रोजी उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी ९ जणांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत हल्लेखोरांनी चार मोटार सायकलींचा वापर केल्याचे समोर आले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक अनिता तारडे करत आहेत.

## शोभाचंद कटारिया यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – बीड येथील रहिवासी शोभाचंद भागचंद कटारिया (वय ८८) यांचे १९ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बीड येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर शहरामध्ये ते मामाजी या नावाने परिचित होते. बीड येथील आनंद एजन्सीचे संचालक धीरज कटारिया यांचे ते वडील होत.



## मनोरमाबाई राछ यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – इमारत कंपनी येथील रहिवासी मनोरमाबाई नरसिदास राछ (वय ८९) यांचे १८ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. १९ फेब्रुवारी रोजी त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, मुलगी, नातु, नातसुना असा परिवार आहे. हितेश, महेश राछ (महेश प्लास्टिक), रंजना विनय ठक्कर यांच्या त्या मातोश्री तर निमेश, मयूर, उत्सव, हर्ष, चिराग यांच्या आजी होत.

## हरेष शर्मा यांचे अल्प आजाराने निधन


श्रीरामपूर – येथील हरेष मुरलीधर शर्मा (वय ५८) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गुरुनानक इलेक्ट्रिकलचे मालक शिवकुमार शर्मा यांचे धाकटे बंधू, पोलीस स्टेशन समोरील राजेश इलेक्ट्रीकल्सचे मालक अजय व अक्षय शर्मा यांचे वडील, रविंद्र, निक्की व गोंधवणीरोड येथील साई बालाजी इलेक्ट्रॉनिक्सचे मालक करण राजेश शर्मा यांचे चुलते होत.

## श्री मंगल भक्त सेवा मंडळाच्यावतीने २१ फेब्रुवारी पासून हनुमान चालिसा पाठ

नगर – श्री मंगल भक्त सेवा मंडळ, एमआयडीसी यांच्यावतीने श्री हनुमान जन्मोत्सवापुर्वी चाळीस दिवस अहिल्यानगर शहरातील वेगवेगळ्या भागात श्री हनुमान चालिसा पाठ व भजन संध्या या कार्यक्रमांचे आयोजन करुन अहिल्यानगर शहरात भक्तीमय वातावरण तयार केले जाते व त्यास नागरिकांचा प्रतिसाद लाभतो. त्यानुसार सालाबादप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री मंगल भक्त सेवा मंडळ यांच्यावतीने श्री हनुमान चालिसा पाठ व भजनसंध्या या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील विविध भागात करण्यात आले असून या कार्यक्रमातील प्रथम पुष्प बागडपट्टी येथील सीताराम सारडा शाळेजवळील श्री काष्ठ गणेश देवस्थान येथे २१ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वा. आयोजित करण्यात आले असून या भजनसंध्या व प्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन काष्ठ गणेश देवस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब पाटेकर यांनी केले आहे.



हनुमान चालिसा पाठ
शुक्रवार दि. २०/०२/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०
श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
जयद्रथ श्रीपतराव खाकाळ (परिवार),
शाहुनगर बस स्टॉप चौक, शाहुनगर केडगाव देवी
९२२५३२३६००

## अवैध सावकारीच्या तक्रारी तातडीने निकाली काढा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – जिल्ह्यात अवैध सावकारीमुळे शेतकरी, व्यावसायिक व सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा. संबंधित प्रकरणांमध्ये नोटीस पोहोच झाल्याची खात्री करूनच गुणवत्तेवर निर्णय घ्यावेत. जिल्ह्यातील पीडित शेतकरी व नागरिकांनी भीती न बाळगता पुढे येऊन अवैध सावकारांविरोधात तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत गठीत त्रिसदस्यीय समितीच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत गठीत त्रिसदस्यीय समितीची बैठक नुकतीच झाली, त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, गरजू नागरिक, व्यावसायिक व शेतकऱ्यांनी अवैध सावकारांकडून कर्ज घेऊ नये. सहकार विभागाकडून परवाना प्राप्त सावकारांकडूनच कर्ज घ्यावे, जेणेकरून अवैध सावकारीला पायबंद बसेल. अवैध सावकारांकडून जादा व्याज आकारून त्रास दिला जात असल्यास सहकार विभागाकडे तक्रार दाखल करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्ह्यात अवैध सावकारी करणाऱ्या २१ सावकारांविरोधात संबंधित तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमान्वये २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, आतापर्यंत १९ अपील प्रकरणांमध्ये २५ हेक्टर १५.५ आर जमीन व २ हजार २०० चौ.फुट बांधकाम विविध शेतकऱ्यांना परत मिळवून देण्याबाबत आदेश पारित करण्यात आले आहेत.

शासनाने परवानाधारक सावकारांसाठी व्याजदर निश्चित केले असून, शेतकऱ्यांना तारण कर्जासाठी ९ टक्के व विनातारण कर्जासाठी १२ टक्के; तर बिगरशेतकऱ्यांना तारण कर्जासाठी १५ टक्के व विनातारण कर्जासाठी १८ टक्के व्याजदर लागू असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी दिली.

## गळफास घेत तरुणाची आत्महत्या

नगर – सावेडी उपनगरातील भूतकरवाडी येथील भिंगारदिवे मळा येथे २१ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १८ फेब्रुवारी रोजी दुपारी उघडकीस आली. ओंकार आप्पासाहेब ताजने असे मयत तरुणाचे नाव आहे.



ओंकार ताजने

ओंकार याने दुपारी आपल्या राहत्या घरी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी तत्काळ त्याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. जयेश लोखंडे यांनी त्याची तपासणी करून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबतची माहिती तोफखाना पोलिसांना देण्यात आली असून त्यावरून तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. महिला पोलीस अंमलदार गायकवाड अधिक तपास करीत आहेत.

## गांजा विक्री प्रकरणी दोघांना पकडले; २५.४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर – गांजा या अंमली पदार्थाचा मोठा साठा एका स्कॉर्पीओ गाडीत घेवून विक्री करण्यासाठी चाललेल्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि मिरजगाव पोलिसांच्या पथकाने संयुक्त कारवाई करत सापळा लावून पकडले आहे. या दोघांकडून १८ लाख १८ हजार रुपये किंमतीचा १३२ किलो गांजाचा साठा, महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ गाडी २ मोबाईल असा एकूण २५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



गणेश अंकुश कराड (वय ३२), सुखदेव शिवनाथ कदम (वय ३०, दोघे रा.रा. आगसखांड, ता. पाथर्डी) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अंमली पदार्थ विक्री करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे.त्या नुसार अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स नोडल अधिकारी तथा स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस अंमलदार, हृदय घोडके, संतोष खैरे, दिपक घाटकर, लक्ष्मण खोकले, बिरप्पा करमल, श्यामसुंदर जाधव, भिमराज खर्से, राहुल डोके, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, प्रशांत राठोड मनोज साखरे, चालक अरुण मोरे, उमाकांत गावडे यांचे पथक नियुक्त करून त्यांना कारवाईसाठी पाठविले होते.

सदर पथक हे मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थबाबत माहिती घेत असतांना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, स्कॉर्पीओ गाडी (क्र.एम. एच. १४ जी. एच. २३३०) मधुन दोन इसम अंमली पदार्थ गांजा विक्रीकरीता कर्जत येथुन पाथर्डीकडे जाणार असल्याची माहिती मिळाली. सदरची माहिती पो.नि. कबाडी यांनी मिरजगाव पोलीस स्टेशनचे स.पो.नि.विजय झंजाड यांना कळवून संयुक्त कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार दोन्ही पथके तात्काळ मिरजगाव ते कर्जत जाणारे रोडवरील ब्रिजखाली महात्मा फुले चौक येथे जावुन सापळा रचुन थांबले. काही वेळातच संशयित स्कॉर्पीओ गाडी येतांना दिसली. दोन्ही पथकांनी गाडी थांबवुन गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये गणेश कराड आणि सुखदेव कदम होते. पोलिसांनी स्कॉर्पीओ गाडीची झडती घेतली असता गाडीचे डिक्कीमध्ये ४ गोण्या मिळुन आल्या. त्यात १३२.८४ किलो ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ आढळून आला. पोलिसांनी गांजा २ मोबाईलव स्कॉर्पीओ गाडी असा एकुण २५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ताब्यात घेतलेल्या आरोपी विरुध्द स्थानिक गुन्हे शाखेचे पो.कॉ. भाऊसाहेब काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरजगाव पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट श्रीराम मंदिर नविपेठ आयोजित ३१ दिवसीय 'महाहनुमान चालीसा 'कार्यक्रमाच्या पत्रिकेचे केले अनावरण

### २ मार्च ते २ एप्रिलपर्यंत विविध ठिकाणी हनुमान चालीसा पठण व भजन संध्या संपूर्ण शहरभर आयोजन

नगर – महाशिवरात्रच्या पावन पर्वावर श्री काशीविश्वेश्वर मंदिर भुतकरवाडी येथे हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रमादरम्यान शिवपुजन व शिव तांडव नृत्य सादरीकरणाने पत्रिका अनावरण पितांबरा बगलामुखी शक्ती पिठम् पिठाधीश मयुरेश गुरुजी विसपुते, रामायणाचार्य गोरक्षनाथ दुतारे महाराज, संजय चव्हाण, इंजी. अनिकेत कौर, दिप चव्हाण, संजय घुले, मंडळाचे उपाध्यक्ष निखील शेटीया इंजी.सतीश पागा, राजेंद्र आडेप यांच्या हस्ते करण्यात आले

होळी पौर्णिमा ते हनुमान जन्मोत्सव उत्सवापर्यंत ३१ दिवसीय कार्यक्रम शुभारंभ २ मार्च रात्रौ ८ वा. श्रीराम मंदिर नविपेठ येथुन प्रारंभ होणार असुन दररोज नगर शहरामध्ये विविध ठिकाणी हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रम आयोजन करण्यात आले. शहरवासियांनी उपस्थित राहावे.

श्रीराम मंदिरात दर शनिवारी सामूहिक हनुमान चालीसा पठण व महाप्रसाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतो. तसेच २१ फ्रेबुवारी दिवशी श्रीराम मंदिर नविपेठ येथे हनुमान चालीसा भजन संध्या व महाप्रसाद व कार्यक्रम पत्रिका वितरण होणार असुन शहरवासियांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट च्या अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटीया वतीने करण्यात आले आहे.



श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट श्रीराम मंदिर नविपेठ आयोजित ३१ दिवसीय 'महाहनुमान चालीसा 'कार्यक्रमाच्या पत्रिकेचे अनावरण करण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### असे खाणे टाळावे...

आपण सर्वजण सॅलडमध्ये काकडी आणि टोमॅटो वापरतो, पण हे मिश्रण आरोग्यासाठी चांगले आहे का? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. चला या अन्न संयोजनाबद्दल सत्य जाणून घेऊया. काकडी आणि टोमॅटो हे सर्वात जास्त वापरले जाणारे सॅलड आहेत, परंतु ते एकत्र खाणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. काकडी हायड्रेशनसाठी उत्कृष्ट आहे. त्यात पाणी, व्हिटॅमिन के आणि फायबर भरपूर प्रमाणात असते. टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी आणि लाइकोपीन भरपूर प्रमाणात असते, जे अँटीऑक्सिडंट म्हणून काम करते. या दोन्ही भाज्यांचे पौष्टिक फायदे अद्वितीय आहेत, परंतु प्रश्न असा आहे की: ते एकत्र खाण्यावर परिणाम करतात का? जेव्हा तुम्ही काकडी आणि टोमॅटो एकत्र खाता तेव्हा त्यांचे पचनसंस्थेवर वेगवेगळे परिणाम होतात. काकडी ही थंडगार भाजी आहे, तर टोमॅटो आम्लयुक्त आहे. काकडी आणि टोमॅटोच्या पचनाच्या वेळा वेगवेगळ्या असतात. यामुळे कधीकधी गॅस, पोटदुखी किंवा पोटफुगी होऊ शकते. आयुर्वेदानुसार, विरुद्ध स्वरूपाच्या गोष्टी एकत्र खाणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जरी हे मिश्रण सर्वांसाठी हानिकारक नसले तरी, संवेदनशील पोट असलेल्या लोकांनी ते एकत्र खाणे टाळावे.

## पाककला

### कॉर्न मेथी मसाला

**साहित्य :** कॉर्न एक कप, मेथीची पाने, आले एक इंचाचा तुकडा, हिरवी मिरची एक, टोमॅटो दोन मध्यम आकाराचे, तेल एक चमचा, जिरे एक चमचा, मीठ चवीनुसार, धणेपूड एक टीस्पून, लाल तिखट एक टीस्पून, आमचूर पावडर दीड टीस्पून

**कृती :** सर्वात आधी एका नॉन-स्टिक पॅनमध्ये ३ कप पाणी गरम करावे आणि त्यात कॉर्न घालावे. साधारण पाच मिनिट कॉर्न उकळवून नंतर पाणी काढून टाका आणि उकडलेले कॉर्न बाजूला ठेवा. आता आले आणि हिरवी मिरची मिक्सरमध्ये एक चमचा पाणी घालून बारीक करावी आणि एका भांड्यात काढा. आता टोमॅटो बारीक चिरून घ्या, मिक्सरमध्ये घाला आणि त्याची पेस्ट बनवा. आता पॅन गरम करा आणि त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर त्यात जिरे आणि हिरवी मिरची-आले पेस्ट घाला. एक मिनिट शिजवा. तसेच त्यात टोमॅटो पेस्ट आणि थोडे मीठ घाला आणि मध्यम आचेवर पाच मिनिटे शिजवा. आता धणे पावडर, लाल तिखट आणि आमचूर पावडर घाला आणि चांगले मिसळा. आता इथे तुम्हाला कॉर्न आणि मेथीची पाने घालून चांगले मिसळावे लागतील. यावेळी, त्यात तीन ते चार चमचे पाणी घाला आणि चांगले मिसळा. तर चला तयार आहे आपली कॉर्न मेथी मसाला रेसिपी, गरम नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### जिमसाठी आरसे

* आरसे हे एक महत्त्वाचे साधन असू शकते. हे ज्ञात आहे की आरसे समोर असलेल्या गोष्टींची ऊर्जा प्रतिबिंबित करतात आणि दुप्पट करतात. ते तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यास देखील मदत करतात आणि प्रेरणा म्हणून काम करू शकतात.
* जिमच्या संपूर्ण भिंतींवर आरसे लावा, परंतु लक्षात ठेवा की तुम्ही ते पूर्व किंवा उत्तरेकडील भिंतींवर लावले पाहिजेत.
* जिममध्ये शौचालय चुकीच्या चौकोनामध्ये असल्यास त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

## सौंदर्य

हँडसम दिसण्यासाठी काही पुरुषांना क्लीन शेव्हन करायला आवडते तर काहींना दाढी ठेवायला आवडते. तुम्हाला दाढी ठेवायची नसेल तर क्लीन शेव ठेवा. यानंतर चेहरा स्क्रब करणे चांगले. फेसवॉशने चेहरा स्वच्छ करायला विसरू नका, यामुळे चेहऱ्याला झटपट ग्लो आणि स्मूथनेस येतो.

## सल्ला

बाहेर जाण्यापूर्वी त्वचेच्या शेडशी जुळणारे कॉम्पॅक्ट लावायला विसरू नका. यामुळे तुमचा चेहरा चिकटपणापासून दूर राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६**

**----, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, उ.भा. २०१०८, सूर्योदय ०६ वा. ३८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.


**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२२५ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दिवंगत मराठी चित्रपट अभिनेता) ७) ++ ++ ++++ (जुन्या काळातील सलमानखान, भाग्यश्री यांचा गाजलेला चित्रपट ६) मास्टर मस्ताना प्यार मेरा दीवाना (गाणे) ८) सुनील दत्त, नूतन यांचा एक गाजलेला चित्रपट ९) गायक मोहंमद रफीनी आपले शेवटचे गाणे या चित्रपटासाठी गायिले १२) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) + + ++ ++ ++ बुड्ढा मिल गया ('संगम'मधील गाणे) २) एक दिवंगत संगीतकार ३) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक गाजलेला चित्रपट ४) +++ +++ पायल बाजे (चित्रपटाचे नाव) ५) ++ ++ ++ + सब हसता हुआ जो जायेगा ओ मुक्कदर का सिकंदर जानेमन कहलायेगा (गाणे) १०) मेरे ++ आओ मेरे दोस्तो एक किस्सा सुनो (गाणे) ११) ++ ऑफ इंडिया (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** प्रेम हे जगाचे सौंदर्य आहे. इतरांशी प्रेमाने वागणे ही आपल्या आत्म्याची सजीवता दर्शवते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'सीबकथॉर्न फळ' नेमके काय आहे?

सीबकथॉर्न फळ, ज्याला हिमालयातील संजीवनी बूटी किंवा लडाखचे सोने असेही म्हणतात, हे एक औषधी वनस्पती आहे. ते प्रामुख्याने भारतातील बर्फाळ आणि उंच प्रदेशात आढळते, जसे की लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड. अलीकडेच पंतप्रधान मोदींनी या फळाची प्रशंसा केल्याने ते प्रकाशझोतात आले आहे. चला त्याची वैशिष्ट्ये जाणून घेऊया.

सीबकथॉर्न फळाची इतर नावे: उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातील काही हिंदी भाषिक भागात याला स्थानिक पातळीवर 'अमेष' असे म्हणतात. प्रादेशिक आणि बोलीभाषेत याला 'हिमालयीन बेरी' म्हणून ओळखले जाते. उत्तर भारतातील काही पर्वतीय प्रदेशांमध्ये याला 'धुरचुक' असेही म्हणतात. हिंदीमध्ये याला काटेरी झुडुपाचे फळ किंवा लडाखचे सोने असेही म्हटले जाते. याला 'वंडर बेरी' आणि 'लेह बेरी' देखील म्हणतात.

सीबकथॉर्न फळ: पोषक तत्वांचा 'पॉवरहाऊस' ओमेगा: सीबकथॉर्न हे जगातील काही वनस्पतींपैकी एक आहे ज्यामध्ये चारही फॅटी ॲसिड्स - ओमेगा-३, ६, ७ आणि ९ - एकत्रितपणे आढळतात.

व्हिटॅमिन सी: त्यात संत्र्यापेक्षा अंदाजे १२ ते १५ पट जास्त व्हिटॅमिन सी असते.

अँटीऑक्सिडंट्स: त्यात जीवनसत्त्वे अ, ई आणि अनेक महत्त्वाची खनिजे भरपूर असतात.

इतर: अँटीऑक्सिडंट्स, फ्लेव्होनॉइड्स, खनिजे आणि अमीनो ॲसिड.

२. सीबकथॉर्न फळाचे प्रमुख आरोग्य फायदे रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे: त्यात असलेले व्हिटॅमिन सीचे उच्च प्रमाण शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते.

त्वचा आणि केस: सुरकुत्या कमी करण्यासाठी, एक्झिमासारखे आजार बरे करण्यासाठी आणि केसांची चमक वाढवण्यासाठी हे वरदान मानले जाते.

हृदय आणि यकृत: हे कोलेस्टेरॉल कमी करण्यास आणि निरोगी हृदय धमन्या राखण्यास मदत करते.

मधुमेह: हे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास देखील उपयुक्त आहे.

पचन: बद्धकोष्ठता आणि आम्लता सारख्या समस्यांपासून आराम देते.

डोळ्यांसाठी: त्यातील ओमेगा-७ घटक डोळ्यांच्या कोरड्यापणापासून आराम देतो.

मेंदू आणि डोळे: स्मरणशक्ती आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते.

चयापचय: वजन कमी करण्यास मदत करते.

३. लडाखमधील सी बकथॉर्न फळ: 'वंडर बेरी' लडाखमध्ये याला 'चर्मा' म्हणून देखील ओळखले जाते. अलीकडेच, लडाखच्या सी बकथॉर्नला त्याची गुणवत्ता आणि वेगळेपणा ओळखून जीआय टॅग (भौगोलिक संकेत) देखील मिळाला आहे. ही वनस्पती -४३अंश ते +४०अंश पर्यंत तापमान सहन करू शकते.

४. सी बकथॉर्न फळ कसे वापरावे?

सी बकथॉर्न अनेक स्वरूपात उपलब्ध आहे: रस/सिरप:

ते पाण्यात मिसळून प्यायले जाते.

तेल: त्वचेची काळजी आणि सांधेदुखीसाठी वापरले जाते.

कॅप्सूल/पूरक पदार्थ:

पौष्टिक हेतूंसाठी, डॉक्टरांच्या निर्देशानुसार.

चहा:

पानांपासून बनवलेला हर्बल चहा खूप लोकप्रिय आहे.

## तीन पर्वतांची गोष्ट

अनेक वर्षांपूर्वी एकाच ठिकाणी तीन पर्वत होते. त्यांच्यामध्ये एक मोठी दरी होती, ज्यामुळे कोणीही त्या बाजूला पोहोचू शकत नव्हते. एकदा देव त्या ठिकाणी आले. त्यांनी पर्वतांना सांगितले, आपण या क्षेत्राचे नाव द्यावे. तुमच्यापैकी एकाच्या नावावर हे नाव ठेवले जाईल. आपण तुम्हा तिघांपैकी प्रत्येकाची इच्छा पूर्ण करू शकतो. एक वर्षानंतर, जो पर्वत सर्वात जास्त वाढतो त्याचे नाव त्या पर्वताच्या नावावर असेल.

पहिल्या पर्वताने वर मागितला: मी सर्वात उंच होवो, जेणेकरून मी दूरवरून दिसू शकेन.

दुसरा म्हणाला: मला दाट आणि हिरवळयुक्त बनवा, नैसर्गिक संसाधनांनी भरलेले.

तिसरा पर्वत म्हणाला: माझी उंची कमी करा आणि दरी सपाट करा, जेणेकरून संपूर्ण परिसर सुपीक होईल.

देवतांनी वरदान दिले आणि ते निघून गेले. एक वर्षानंतर जेव्हा ते त्या भागात परतले तेव्हा त्यांनी पाहिले की पहिला पर्वत खूप उंच झाला होता, परंतु कोणीही त्यापर्यंत पोहोचू शकले नाही.

दुसरा पर्वत इतका दाट आणि हिरवागार झाला होता की सूर्यप्रकाश त्यात प्रवेश करू शकत नव्हता, त्यामुळे कोणीही आत जाण्याचे धाडस करत नव्हते. तिसऱ्या पर्वताची उंची लक्षणीयरीत्या कमी झाली होती आणि खंदक भरल्यामुळे त्याच्या सभोवतालची जमीन सुपीक झाली होती, म्हणून लोक तिथे वस्ती करू लागले. देवतांनी तिसऱ्या पर्वताच्या नावावरून त्या भागाचे नाव ठेवले.

तात्पर्य : जे समाजाच्या विकासासाठी आपले गुण आणि संपत्ती वापरतात तेच आदरास पात्र असतात.

## जीवन का अमृत (भाग १)



३. हमारी भौतिक जिंदगी प्रभु द्वारा लिखी गई है और हमें से हर एक को दी गई भूमिका अवश्य ही अदा करनी होगी। इस बात में मेरी

४. बिना किसी प्रभु रूप हस्ती के आत्मा की गुत्थी सुलझती नहीं है। यह एक बंद किताब रहती है।

आत्मा का उच्चतर मंडलों में चढ़ाई करना असंभव है, जब तक कि हमें उन मंडलों में पहुँचा न दिया जाए।

हालाँकि साधक अपनी आत्मा की धारा को सिमरन के द्वारा, शरीर में दिव्यचक्षु तक समेट सकता

### प्रारंभिक अवस्था

है या कभी-कभी कुछ ज्योति देख सकता है, पर वहाँ उसे ऊपर ले जाने वाला या उसका मार्गदर्शन करने वाला कोई भी नहीं होता है।

बहुत से इन प्रारंभिक अवस्थाओं में युगों-युगों तक अटके रहे और उन्हें ऊपर जाने के लिए कोई सहायता नहीं मिली। कुछ लोगों ने इस अवस्था को ही सब का आदि और अंत बताया है पर वे अब भी स्थूल तत्व के आसपास ही भटक रहे होते हैं और सूक्ष्म तत्त्व में बुरी तरह से हुए होते हैं। यहाँ पर किसी ऐसे समर्थ पुरुष की सहायता की जरूरत होती है, जो कि भक्त को सूक्ष्म तत्व की जकड़नों से बाहर निकाल सके। वह समर्थ पुरुष, ऐसा इंसान है, जो आध्यात्मिक विकास की विभिन्न अवस्थाओं से गुजर चुका है और शुद्ध आत्मा के मंडल सतनाम तक यात्रा कर चुका है, जो कि माया की पकड़ से बहुत दूर है।

५. इंसान को समझाने के लिए इंसान की जरूरत होती है। संत, इंसान की सूरत में परमात्मा है और परमात्मा को चाहने वाले उससे मिल सकते हैं। अदृश्य प्रभु का इस बारे में अपना ही नियम है। इसलिए संत, प्रभु + इंसान है। वह प्रभु का प्रवक्ता है, या अगर कोई इसे स्वीकार करे, तो वह इंसानी चोले में प्रभु है। वह सबसे पवित्र व्यक्तिगत प्रभु' है, जिसके पास सभी अधिकार और

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

चाहे कितने बुरे व्यक्ति आप के पास हैं उस का आप पर प्रभाव नहीं होगा। दूसरों की कमियां खोजना, दूसरों को नीचा दिखाना तथा बड़बोले लोगों का चक्र असंतुलित होता है।

भ्रष्टाचार करने वाले और गलत लोगो का साथ देने वालो का चक्र असंतुलित होता है।

जो चिंता से घिरे रहते हैं उन का यह चक्र बंद होता है। दूसरों को नीचा दिखा कर स्वय को शक्तिशाली महसूस करते हैं।

जब यह चक्र संतुलित नहीं है तो नकारात्मक संकल्प मन में टकराते रहते हैं और सिर के उपरी भाग या गर्दन में दर्द रहने लगता है।

सहस्त्रार चक्र - ९ - सन्तुलन

यह चक्र जब संतुलन में होता है तो हम एकांत पसंद करते हैं। हम अंदर की ओर बढ़ने लगते हैं।

### कम बोलना क्यों चाहिए

हम खुद के कार्य और मानसिक विकास में लग जाते हैं। आप सीखने ज्यादा लगते हैं और बोलते कम हैं।

सहस्त्रार चक्र के अनुसार मनुष्य का आभामंडल बनता है। जब आनन्द का अनुभव होने लगे तो समझो यह चक्र संतुलन में है। सिर में मीठा मीठा करंट सा लगता है। इसे हम वर्णन नहीं कर सकते।

रिश्तों एवं धन दौलत की आसक्ति खत्म हो जाती है। शाकाहार तथा ताजे फलों की ओर रुझान बढ़ जाता है यह चक्र मस्तिष्क के तालू भाग को स्पर्श करता है। यह चक्र पीनियल ग्रंथि के रोग, वृद्धावस्था की प्रक्रिया से जुड़ा हुआ है।

हाथी की चिंघाड़ की आवाज से यह चक्र संतुलन में आता है। साधना में बैठे हुए मन में हथियों की चिंघाड़ को सुना करें। तब ये चक्र संतुलित हो जाता है।

सहस्त्रार चक्र - १० - कार्य

सहस्त्रार चक्र आत्मा का ब्राडकास्टिंग और रिसीविंग सेंटर है। सहस्त्रार चक्र पिचुटरी ग्रंथि से जुड़ा हुआ है। सहस्त्रार चक्र में १००० पंखुडियां होती हैं। ये पंखुडियां वास्तव में नाड़ियां हैं जिन में प्रकाश टिम टिम करता रहता है। ये नाड़ियां और कुछ नहीं १००० एरियल हैं। यह चक्र ईथर तत्व में स्थित है। इथर तत्व संकल्पों का सुचालक है। मन में जहां हम सोचते हैं वहां इथर है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : जर ती माझी झाली नाही तर मी तिला कोणाचीच होऊ देणार नाही..!!

मित्र : आणि तुझी झाली तर सर्वांची होऊन देशील का ?.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतीय फलंदाज विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये किती धावांचा टप्पा ओलांडला आहे? - १४ हजार

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

८) शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी आणि रक्तशुद्धीसाठी पिकलेल्या अंजिराचे दोन भागांत विभाजन करून त्यामध्ये गूळ भरून ठेवावा. पहाटे ब्राह्म मुहूर्तावर चूळ भरून खावे. असे नियमितपणे सेवन केल्यास शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढवते व उष्णताही कमी होते.

९) नियमितपणे अंजीर खाल्ल्याने आजारपणात शरीराची झालेली हानी लवकर भरून येते. अंजीर खाल्ल्याने त्याच्या पौष्टिक गुणधर्मामुळे शरीराचा उत्साह वाढून मानसिक थकवाही दूर होतो.

१०) मुखपाक या आजारात ओठ, जीभ, तोंड यांना कात्रे पडतात व फोड येतात. अशावेळी अंजीर खाल्ल्यास या जखमा लवकर भरून येतात. तसेच कच्च्या अंजिराचा चीक या जखमांना लावावा.

### अंजीर

११) अंजिरामध्ये तंतुयुक्त पदार्थ भरपूर असल्यामुळे व तसेच त्यामध्ये सारक व रेचक गुण असल्यामुळे मूळव्याधीवर अंजीर हे औषधाप्रमाणे कार्य करते. थंड पाण्यामध्ये दोन ते तीन अंजीर रात्री भिजत घालून सकाळी तेच अंजीर खावे. त्यामुळे शौचास साफ होऊन गुदद्वाराची आग होत नाही. हा प्रयोग सलग महिनाभर केल्यास मूळव्याध हा आजार आटोक्यात आणता येतो.

१२) अशक्तपणा खूप जाणवत असेल तर अंजीर, खजूर, बदाम व लोणी एकत्र करून खावे. १५ दिवसांतच अशक्तपणा कमी होऊन शरीरास शक्ती प्राप्त होते.

१३) अंजीर त्वचेच्या विकारांमध्ये उत्तम कार्य करते. श्वेतकुष्ठामध्ये (पांढरे डाग) अंजिराचा नियमितपणाने आहार सेवन केल्यास फायदा होतो.

१४) पायांना जळवातांच्या भेगा पडल्या असतील, तर कच्च्या अंजिराचा चीक लावल्यास लवकर भरून येतात.

१५) दम्यावरही अंजीर गुणकारी आहे. अंजीर आणि लालसर पांढरी गोरख चिंच सम प्रमाणात घेऊन रोज सकाळी एक तोळा खावी. त्यामुळे श्वसनक्रिया सुलभ होऊन दम्याचा त्रास कमी होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेपूर्वी शुभेच्छा देत निरोप देण्यात आला.

# कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि शिस्त बाळगल्यास यश निश्चित

### प्राचार्य सुनिल पंडीत यांचे प्रतिपादन; विधाते विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक वाटेबद्दल मार्गदर्शन

नगर – विद्यार्थ्यांनो, आयुष्यात मोठे ध्येय ठेवा. ध्येय स्पष्ट असेल तर त्याकडे वाटचाल करणे सोपे होते. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि शिस्त या तीन गोष्टी अंगी बाळगल्यास यश निश्चित मिळते. अपयश आले तरी खचून जाऊ नका; तेच यशाची पहिली पायरी असते, असे प्रतिपादन प्राचार्य सुनिल पंडीत यांनी केले.

सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्तर) माध्यमिक विद्यालयामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेपूर्वी शुभेच्छा देत निरोप देण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी करिअर मार्गदर्शनपर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. दहावीनंतर कोणत्या शाखांची निवड करावी, विविध व्यावसायिक अभ्यासक्रम, तांत्रिक प्रशिक्षण, तसेच पुढील शैक्षणिक दिशा कशी ठरवावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुनिल पंडीत उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सरचिटणीस प्रा. शिवाजीराव विधाते, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष सुसे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के, संजय कदम यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते. तसेच धर्मनाथ विद्यालय वडगाव तांदळी चे सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रभाकर बोडखे हे यांनी दहावीत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला १ हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले.

मार्गदर्शन सत्रात विद्यार्थ्यांना विज्ञान, वाणिज्य, कला या पारंपरिक शाखांबरोबरच आयटीआय, पॉलिटेक्निक, पॅरामेडिकल, कृषी, संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा, लघुउद्योग प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांचा विचार करून योग्य दिशा निवडावी, असे आवाहन करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व पटवून दिले.

प्राचार्य सुनिल पंडीत म्हणाले की, विद्यार्थ्यांनो, आयुष्यात मोठे ध्येय ठेवा. ध्येय स्पष्ट असेल तर त्याकडे वाटचाल करणे सोपे होते. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि शिस्त या तीन गोष्टी अंगी बाळगल्यास यश निश्चित मिळते. अपयश आले तरी खचून जाऊ नका; तेच यशाची पहिली पायरी असते.

प्रा. शिवाजीराव विधाते म्हणाले, माणूस त्याच्या उंचीने किंवा परिस्थितीने मोठा होत नाही, तर कर्तृत्वाने मोठा ठरतो. आपल्या कष्टांवर विश्वास ठेवा. गाव, कुटुंब आणि शाळेचे नाव उज्वल करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. शिक्षण हेच खरे भांडवल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक सारिका गायकवाड यांनी केले. परिचय सचिन बर्डे यांनी करून दिला. यावेळी रोशनी गोपाळघरे व प्रिया साठे या विद्यार्थिनींनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. त्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे जीवनाला योग्य दिशा मिळाल्याचे सांगत कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन अमोल मेहेत्रे यांनी केले. भाऊसाहेब पुंड यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वारीचे रिंगण – भक्तिखेळ







पंढरीच्या विठ्ठलाचे उत्कट भावदर्शन घडते ते लोकवाणीतून. लोकसाहित्य म्हणजे जनमानसाचा स्वाभाविक आविष्कार. संतवाणीच्या विलक्षण प्रभावाने महाराष्ट्राच्या जनमानसाला विठ्ठल खऱ्या अर्थाने ज्ञात झाला तर लोकवाणीच्या प्रभावाने, लोकमानसाने तो आपलासा केला. लोकसाहित्यातील ओव्या, लोकगीते, लोककथा यातून उभे राहिलेले विठ्ठलाचे रूप पाहिल्यावर हाच महाराष्ट्राचा खरा लोकदेव आहे आणि मराठी माणसाच्या मनावर शतकानुशतके अधिराज्य गाजवतो आहे हे लक्षात येते. लोकवाणीतील विठ्ठलवर्णनाच्या रचनेत सहजता आहे, स्वाभाविकता आहे. कुठे कृत्रिमता नाही, अभिनिवेश नाही. लोकवाणीला, लोकसाहित्याला विठ्ठलाचा मोह पडावा आणि अनेक नात्यांनी विठ्ठलाशी जोडत आळवणी व्हावी हेदेखील स्वाभाविक आहे.

विठ्ठल, रुक्मिणी, पंढरपूर, पुंडलिक, भक्तगण, साधुसंत, दिंड्या पताका, दिंडीरवन, गरूडखांब, चंद्रभागेचे वाळवंट, तुळशीची कथा, बुक्क्याची आवड, रूक्मिणीचं रुसणं, देवाचं हसणं या साऱ्या गोष्टी भावदर्शनार्थ लोकसाहित्यात येतात आणि युगानुयुगे जनमानसात आपलं घर करून राहिलेला विठ्ठल त्यातील भावदर्शनाने अधिक जवळ येतो. उदाहरणच द्यायचे झाले तर पंढरपुरात खूप मोठी यात्रा भरते. सगळीकडे माणसंच माणसं. वारकरी, पडशी,

पताका, टाळ–मृदुंगाचा गजर.
मग विठ्ठलाला शोधण्यासाठी कुणी एक खेडूत स्त्री जवळच्या बाईला विचारते,
पंढरपुरामंदी देवाची कंची आळी।
इट्टलदेव बोल दारी बुक्क्यांची रांगोळी ।

बुक्क्यांची रांगोळी ज्या दारात ती विठ्ठलाची आळी. ज्ञानोबा–तुकोबारायांची पालखी वाखरीला येते. तिथं मोठं रिंगण होतं. हे रिंगण म्हणजे संत आणि विठ्ठल यांच्यातील प्रेमभावाच्या व्यापक परिघाचे दर्शन. हे रिंगण म्हणजे साधुसंतांचा भक्तिखेळ. हे रिंगण म्हणजे देह, प्रपंच यांच्याही बाहेर जाऊन व्यापकत्वाच्या परिघात मनाला एकरूप करावयाचा संतखेळ. म्हणून तर या रिंगणात देहातीत होऊन संत खेळतात आणि लोकगीतातून मांडले जाते,

वाखरीच्या हिरीवरीं जोड कंदिल झळकती।
ज्ञानोबा–तुकोबा साधु रिंगण खेळती।

ज्ञानोबाराय, तुकोबाराय ज्ञानभक्तिचे जोड कंदील आणि त्याच्या प्रकाशात रंगलेला हा संतखेळ अनुभवण्यासाठी एकदा वारीला यावेच.

**– किशोर गांधी**

# गंभीर गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मंजूर

नगर – हॉटेल निल केडगाव बाजार समिती बायपास रोड अ.नगर येथे एलपीजी गॅस टँकर मधून अनाधिकृत पध्दतीने मानवी जीवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने गॅस काढून व्यवसायिक गॅस टाक्या भरून देत असे, अशा कथनाच्या आधारे आरोपी राजेंद्र अशोक साबळे रा.निल हॉटेल केडगांव व इतर ४ आरोपी विरूध्द कोतवाली पोलीस स्टेशन येथे बीएनएस२०२३ चे कलम २८७, २८८, जिवनावश्यक वस्तू कायदा कलम, स्फोटक कायदा कलम, पेट्रोलियम कायदा कलम, एलपीजी कायदा कलम अन्वयेनुसार तथाकथित गंभीर स्वरुपाचा गुन्हा पोलीसांनी दाखल केला होता. तथापि सदर आरोपी विरूध्द सदर गुन्ह्यात सबळ व ठोस पुरावा नाही. सदर गुन्हाशी सदर आरोपी यांचा संबंध नाही यासाठी सदर आरोपीतर्फे ॲड. सचिनदेवा पाठक यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिन अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर पूर्णपणे युक्तीवाद करून ठोस पुरावा आरोपीविरूध्द दाखल नाही. सदर आरोपीचा सदर गुन्ह्याशी संबंध नाही. तथाकथित एलपीजी गॅस इंधन सदर आरोपी गॅस टाक्यात भरत होता व विक्री करत होता, असा एकही पुरावा उपलब्ध नाही तसेच आरोपी हा केडगाव येथील हॉटेल व्यवसायिक असून त्यांचा गुन्ह्याशी संबंध नाही या व इतर महत्त्वाचा सर्व गोष्टी व विनाकारण सदर गुन्ह्यात या आरोपीस अडकविण्यात आले आहे. ॲड. सचिन पाठक यांनी केलेला युक्तिवाद व न्यायालयाच्या समोर आलेले सर्व पुरावे या आधारावर जिल्हा न्यायालयाने सदर आरोपीचा अटकपूर्व जामिन अर्ज मंजूर केला. ज्या इतर गुन्ह्यात आरोपी आहे असे पोलीसांनी कोर्टात सांगितले त्या गुन्ह्यात हा आरोपी नसून इतर व्यक्ती आरोपी आहेत. इतराचे गुन्ह्यात राजेंद्र साबळे यांना आरोपी दाखवून कोर्टाची दिशाभूल करून जामिन भेटू नाही म्हणून सरकार पक्षाने भरपूर निष्फळ प्रयत्न केला तथापि सदर आरोपीस अटकपूर्व जामिन मिळवून देण्यात ॲड. सचिन पाठकगुरूजी यांना यश आले

# उत्कर्ष बालभवनात मोफत दंत चिकित्सा शिबिरात ७२ बालकांची तपासणी

### तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, ब्रशचे वाटप



नगर – स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवन, कोठला येथे रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर प्रियदर्शनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दंत चिकित्सा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. बालकांमध्ये दंत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे व त्यांची मोफत तपासणी करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी दंत चिकित्सक डॉ. चंद्रकांत डुंगरवाल व डॉ. ममता डुंगरवाल यांच्यासह रोटेरियन कुंदा हळबे, देविका रेळे, विभा तांबडे, रजनी भंडारी व सविता काळे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची प्रस्तावना रुबीना शेख यांनी प्रभावी शब्दांत केली, तर सूत्रसंचालन साजेदा शेख यांनी संयत व आकर्षक पद्धतीने पार पाडले.

या शिबिरात एकूण ७२ बालकांची (२५ मुले व ४७ मुली) सखोल दंत तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही बालकांमध्ये दात किडणे, हिरड्यांची सूज आदी समस्या आढळल्या. संबंधित मुलांना पुढील उपचारासाठी योग्य सल्ला देण्यात आला. तसेच आवश्यक असल्यास त्यांच्या दवाखान्यात मोफत उपचार करण्याचे आश्वासन डॉक्टरांनी दिले.

डॉ. डुंगरवाल यांनी मुलांना दिवसातून दोन वेळा दात घासण्याचे महत्त्व, गोड पदार्थांचे प्रमाण कमी ठेवणे व नियमित तपासणीचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले.

कुंदा हळवे यांनी संवादात्मक पद्धतीने मुलांशी चर्चा करून स्वच्छतेच्या सवयींबाबत जनजागृती केली. शिबिराच्या शेवटी सर्व बालकांना दातांच्या स्वच्छतेसाठी ब्रश भेट देण्यात आले.

भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी कार्यासाठी रुबिना शेख, साजेद शेख, मिनाज शेख आदी प्रयत्नशील राहिले.

# माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये नाशिक विभागात अहिल्यानगर जिल्हा परिषद अव्वल

### तीन ग्रामपंचायतींना दीड कोटींचे पुरस्कार जाहीर

नगर – 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याने पुन्हा एकदा बाजी मारली असून नाशिक विभागात सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींना एकूण एक कोटी पन्नास लाख रुपयांचे पुरस्कार मिळाले आहेत.

या अभियानात जिल्हा परिषदेने सलग पाचव्यांदा पुरस्कार मिळवला आहे. राज्य शासनाच्या वतीने १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातील २७ हजार ८९५ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला होता.

अभियानात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींना नाशिक विभागस्तरावर प्रथम पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये तीन हजार ते पाच हजार लोकसंख्या गटात शेवगाव तालुक्यातील आव्हाने बुद्रुक, दीड हजार ते अडीच हजार लोकसंख्या गटात अकोले तालुक्यातील लहित खुर्द व दीड हजारपेक्षा कमी लोकसंख्या गटात श्रीरामपूर तालुक्यातील जाफराबाद या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या तिन्ही ग्राम पंचायतींना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर झाले आहे. याशिवाय विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गटविकास अधिकारी म्हणून पंचायत समिती अहिल्यानगर व राहाता, तर जिल्हास्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गटविकास अधिकारी म्हणून पंचायत समिती संगमनेर यांना प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे.

जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन नोडल अधिकारी समर्थ शेवाळे यांच्या नियंत्रणाखाली ग्रामीण भागात उत्कृष्ट कामकाज करण्यात आले. तसेच २०२५–२६ मधील क्षेत्रीय पाहणी व मूल्यांकन विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या सूक्ष्म नियोजनाखाली झाल्यामुळे राज्याच्या व विभागाच्या यादीत जिल्ह्याला ही मोठी संधी मिळाली आहे.

पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींनी बक्षीसाच्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम हरित क्षेत्र वाढवण्यासाठी व उर्वरित ५० टक्के रक्कम पर्यावरणपूरक उपाययोजनांसाठी खर्च करावयाची आहे. या ग्रामपंचायतींनी भूमी, वायू, अग्नी, जल व आकाश या घटकांमध्ये शासनाच्या निर्देशानुसार प्रभावी उपाययोजना केल्या आहेत. भूमी घटकांतर्गत देशी प्रजातींच्या झाडांची लागवड, जुन्या झाडांचे संगोपन, रोपवाटिका निर्मिती, कचरा संकलन व प्रक्रिया, तसेच एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली. गावे हागणदारीमुक्त करून मॉडेल गावे तयार करण्यात आली. वायू घटकात हवेची गुणवत्ता तपासणी, फटाके बंदी, सायकल ट्रॅकची निर्मिती व विद्युत वाहनांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले. जल घटकांतर्गत पाणी पातळी वाढवणे, जलस्त्रोतांची स्वच्छता, सार्वजनिक इमारतींचे जल लेखापरीक्षण (वॉटर ऑडिट), पर्जन्य जल संधारण व पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी कृत्रिम जलकुंडांची निर्मिती करण्यात आली.

अग्नी घटकांतर्गत गावांमध्ये सौर दिवे, एल.ई.डी. पथदिवे लावणे व घरांवर तसेच शेतीसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. सार्वजनिक इमारतींचे ऊर्जा लेखापरीक्षण करून विद्युत बचतीवर भर देण्यात आला. आकाश घटकामध्ये अभियानाच्या प्रचार व प्रसारासाठी माहिती, शिक्षण व संवाद आराखडा तयार करून स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना व विद्यार्थ्यांना हरित शपथ देऊन पर्यावरण दूत म्हणून सहभागी करून घेण्यात आले. भिंतींवर पंचतत्त्वांची चित्रे काढून जनजागृती करण्यात आली.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत आतापर्यंत अहिल्यानगर जिल्ह्यातील ३२ ग्रामपंचायतींना एकूण २० कोटी ६५ लाख रुपयांचे पुरस्कार मिळाले आहेत. पुढील माझी वसुंधरा अभियान ६.० (२०२५–२६) मध्येही पुरस्कार जिंकण्याचे उद्दिष्ट असल्याचे नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी स्पष्ट केले आहे. हे यश मिळवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, नोडल अधिकारी राजेंद्र देसले, जिल्हा समन्वयक रविंद्र ठाणगे यांच्यासह गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी, विस्तार अधिकारी, डाटा एंट्री ऑपरेटर व सरपंचांचे मोठे योगदान लाभले आहे.

# ६ सेमी मूत्राशयातील खड्यासाठी अहिल्यानगरात यशस्वी शस्त्रक्रिया


### ४ वर्षे विसरलेला डबल–जे स्टेंट ठरला धोकादायक

नगर – शहरातील एशियन नोबल हॉस्पिटल येथे एका महिलेच्या मूत्राशयात तब्बल सुमारे ६ सेमी आकाराचा खडा आढळून आला. तपासणीत समोर आले की, हा खडा चार वर्षांपूर्वी बसवलेल्या आणि त्यानंतर काढणे विसरलेल्या डबल–जे (DJ) स्टेंटमुळे तयार झाला होता. रुग्णाला स्टेंटबाबत विसर पडल्याने तो दीर्घकाळ शरीरातच राहिला आणि त्यावर खनिजांचे थर साचत जाऊन मोठ्या दगडाचे रूपांतर झाले. रुग्णाला लघवी करताना वेदना, वारंवार संसर्ग आणि अस्वस्थता जाणवत होती. एक्स–रे आणि इतर तपासणीत मूत्राशयात सर्पाकृती कॉईलसारखा दिसणारा स्टेंट स्पष्ट झाला. त्यावर मोठ्या प्रमाणात एन्क्रस्टेशन (खनिज साठा) झाल्याने जवळपास ६ सेमीचा खडा तयार झाला होता. या क्लिष्ट प्रकरणात डॉ. अमेय रंगनाथ सांगळे यांच्या नेतृत्वाखाली शस्त्रक्रिया करण्यात आली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. कैलास गिरी यांनी जबाबदारी सांभाळली. ऑपरेशनदरम्यान नर्स सरिका, सहाय्यक सिद्धार्थ तसेच संपूर्ण ऑपरेशन थिएटर पथकाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. अत्यंत काळजीपूर्वक नियोजन, संसर्ग प्रतिबंधक उपाययोजना आणि शस्त्रक्रियेनंतरची योग्य देखरेख यामुळे ऑपरेशन यशस्वीरीत्या पूर्ण झाले. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून ती सुधारत आहे.

तज्ज्ञांच्या मते, युरोलॉजीमध्ये वापरले जाणारे ञ्ञ स्टेंट हे तात्पुरते असतात. त्यांना वेळेत काढले नाही तर गंभीर एन्क्रस्टेशन, संसर्ग, रक्तस्राव आणि मोठे दगड तयार होण्याचा धोका वाढतो. डॉ. सांगळे म्हणाले, स्टेंट बसवल्यानंतर नियोजित फॉलो–अप आणि रिमूव्हलची तारीख निश्चित ठेवणे अत्यावश्यक आहे. रुग्णांनी डॉक्टरांच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

या घटनेतून नागरिकांना महत्त्वाचा संदेश देण्यात आला आहे – 'स्टेंट विसरू नका; वेळेत तपासणी आणि काढणे हेच सुरक्षिततेचे सूत्र आहे. एशियन नोबल हॉस्पिटल आणि त्यांच्या तज्ज्ञ पथकाच्या कौशल्यामुळे ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.

# नगरला २५ फेब्रुवारीला मेहेरबाबांचा जन्मोत्सव कार्यक्रम




नगर – सरोष पेट्रोल पंपा शेजारील अवतार मेहेरबाबानगर केंद्रामध्ये अवतार मेहेरबाबाच्या १३२ वा जन्मोस्तव कार्यक्रम २५ फेब्रुवारीला होणार आहे अशी माहिती डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली

२५ फेब्रुवारी रोजी पहाटे ६ वाजता अवतार मेहेरबाबा याचा जन्मोस्तव सोहळा होणार आहे, याप्रसंगी विविध कार्यक्रम होणार आहे. नगरसह देश विदेशातील भाविक यावेळी गीते सादर करतील. तर बाबा कार्या विषयी प्रवचन हि होणार आहे, नंतर सकाळी ९ वाजता मेहेरबाबाच्या सप्तरंगी ध्वजाचे अनावरण होणार आहे. यावेळी ध्वजगीत, भजन, आरती होईल. नंतर प्रार्थना व प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल

२६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी मेहेरप्रेमींचा मेळावा होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नगर सेंटरच्या पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

# गुरु धाम व शक्ती धाम येथे अभिषेक व सत्संगाचा सोहळा





नगर – महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर गुरु धाम आणि शक्ती धाम येथे भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने भरलेला धार्मिक कार्यक्रम भक्तिभावात झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ दिसून येत होती. पारंपरिक विधीनुसार दुधाने व बेलपत्रांनी ओंकारेश्वर व नागेश्वर महादेवांचा अभिषेक करण्यात आला. ॐ नमः शिवायच्या गजरात झालेल्या अभिषेकामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

अभिषेकानंतर उपवास करणाऱ्या भाविकांसाठी साबुदाणा खीर व फळाचा प्रसाद वाटप करण्यात आले. शिस्तबद्ध पद्धतीने झालेल्या प्रसादवाटपामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले. मंदिर समिती व स्वयंसेवकांनी प्रसादवाटपाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. यावेळी महिला, ज्येष्ठ नागरिक व बालभाविकांची विशेष उपस्थिती लक्षणीय होती.

संध्याकाळी सहानंतर श्री गदाधरजी स्वामी यांच्या उपस्थितीत भक्तिमय सत्संगाचे आयोजन करण्यात आले. या सत्संगात रामचरित मानसातील शंकर–पार्वती विवाह, अर्पणभाव, तसेच शंकरांचे रामावरील अपार प्रेम याविषयी प्रेरणादायी कथांचे रसाळ कथन झाले. कथनासोबत केलेल्या भावपूर्ण विवेचनामुळे उपस्थित भाविक अंतर्मुख झाले. सत्संगानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या कार्यक्रमाची सांगता ॐ नमः शिवायच्या गजरात झालेल्या कीर्तनाने झाली. शिस्त, स्वच्छता आणि भक्तीभाव यांचे सुंदर दर्शन घडवणारा हा शिवरात्रीचा सोहळा भाविकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणारा ठरला. आयोजकांच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे कार्यक्रम शांततापूर्ण व उत्साहात पार पडला, अशी प्रतिक्रिया उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# 'हिंद–दी–चादर' ३५० व्या शहिदी समागम सोहळ्यासाठी अहिल्यानगर प्रशासन सज्ज

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक



शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद–दी–चादर' समागम सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली.

नगर – शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद–दी–चादर' समागम सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत स्थानिक पातळीवरील कार्यक्रम व नवी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य सोहळ्याच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

२२ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथील गोविंदपुरा भागातील गुरुद्वारा भाई दया सिंगजी येथे आरोग्य शिबिर व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनाबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. तसेच, राज्यस्तरावर नवी मुंबईतील खारघर (ओवे मैदान) येथे २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी मुख्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या महासोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून भाविक उपस्थित राहणार आहेत. या भाविकांच्या प्रवासासाठी वाहतूक व्यवस्था व सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांवर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

या बैठकीसाठी जिल्हा समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती भारती सागरे, अन्न धान्य वितरण अधिकारी श्रीमती सपना भोवते, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस.व्ही. डावरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवशंकर वलांडे, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. वृषाली आरु, नायब तहसीलदार मयुर बेरड, सहायक महसुल अधिकारी राजेंद्र लाड उपस्थित होते.

तसेच कार्यक्रमाच्या नियोजनात समन्वयासाठी गुरुद्वाराचे प्रतिनिधी अमरप्रित वाही, रविंदर नारंग व हरप्रितसिंग नारंग यांची देखील या बैठकीला प्रमुख उपस्थिती होती. प्रशासकीय यंत्रणा व शीख समुदाय यांच्या समन्वयाने दोन्ही कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते यांनी यावेळी दिल्या.

# माझी वसुंधरा ५.० अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेला सलग तिसऱ्या वर्षी पुरस्कार

## महाराष्ट्रातील ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अहिल्यानगर महानगरपालिका तिसऱ्या क्रमांकावर शहरासाठी केलेल्या उपाययोजनांचे चीज झाले : आयुक्त यशवंत डांगे

नगर – राज्य शासनाच्या माझी वसुंधरा ५.० अभियानांतर्गत घेतलेल्या स्पर्धेत अहिल्यानगर महानगरपालिकेला सलग तिसऱ्या वर्षी पहिल्या तीन क्रमांकामध्ये पुरस्कार मिळाला आहे. ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अहिल्यानगरला तृतीय पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. माझी वसुंधरा अभियानात विशेष मेहनत घेऊन केलेल्या उपाययोजना, त्याचबरोबर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कचरा मुक्त शहराला थ्री स्टार मानांकन यामुळे, तसेच नागरिकांच्या व महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे महानगरपालिका ही कामगिरी करू शकली, अशी भावना आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केली.

माझी वसुंधरा अभियानात गेली दोन वर्षे महानगरपालिकेला राज्यस्तरीय दुसरा क्रमांक मिळाला होता. यंदाही महानगरपालिकेने चांगली कामगिरी करत तिसरा क्रमांक मिळवला आहे. भूमी, वायू, अग्नी, जल, आकाश या घटकात शासनाच्या निर्देशानुसार उपाययोजना करण्यात आल्या. शहरात या विषयी विविध अभियान राबवून नागरिकांना सहभागी करून घेण्यात आले. महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, विशेषतः घनकचरा व्यवस्थापन विभाग व सफाई कामगारांनी घेतलेल्या मेहनतीमुळे महानगरपालिका ही कामगिरी करू शकली.

यापूर्वी अहिल्यानगर महानगरपालिकेने माजी वसुंधरा अभियान २.० मध्ये १.५० कोटी, ३.० मध्ये ६.०० कोटी व ४.० मध्ये ६.०० कोटी असे एकूण १३.५० कोटी इतके पारितोषिक प्राप्त केले आहे. शहरात विविध उद्याने हरित क्षेत्र, सौर ऊर्जेचे प्रकल्प, वृक्षारोपण तसेच वसुंधरेबाबत जनजागृती आदी उपक्रमांसाठी या निधीचा वापर करण्यात आला. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत दुसऱ्या तिमाहीमध्ये हरित शपथ घेण्यामध्ये अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात तीन ते दहा लक्ष लोकसंख्ये गटामध्ये प्रथम स्थानी होती. शहरातील १,४८,८९५ नागरिकांनी वैयक्तिक हरित शपथ घेतली. तर २००२ समुहांनी सामूहिक शपथ घेतली होती, असेही आयुक्त डांगे यांनी सांगितले. माझी वसुंधरा ६.० या अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेने तीन ते दहा लक्ष लोकसंख्ये गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून सर्व नागरिकांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

**भूमी :** या घटका अंतर्गत मनपाने वर्षभरात देशी प्रजातीच्या झाडांची लागवड केली. झाडाचे संगोपन करून त्यांना जगवले. कचऱ्याचे घरोघरी संकलन करून त्यावर प्रक्रिया करण्यात आली. सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी जनजागृती करण्यात आली होती. शहर हागणदारीमुक्त करून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 'ओडीएफ प्लस'चा दर्जा कायम ठेवला.

**वायू :** या घटकात मनपाने अभियान कालावधीत हवेची गुणवत्ता तपासून त्यावर उपाययोजना केल्या. सण उत्सवात प्रदूषण टाळण्यासाठी जनजागृती करण्यात आली. सातत्याने स्वच्छता मोहिमा राबवतात शहरातील तयार होणारा बांधकाम, पाडकामाचा राडारोडा, कचरा उचलून विल्हेवाट लावण्यात आली.

**जल :** या घटकात मनपाने शहरातील पाण्याची पातळी राखण्यासाठी उपाय योजना केल्या. शहरातील पाणीसाठ्यांची साफसफाई केली. शहरातील सीना नदी पात्रात स्वच्छता करण्यात आली. सार्वजनिक इमारतीचे वाटर ऑडिट करण्यात आले. रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. गणपती विसर्जन दरम्यान जल प्रदूषण टाळण्यासाठी शहरात विविध ठिकाणी कृत्रिम कुंड तयार केले. इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांना त्याचे फायदे तोटे समजावून सांगून इको फ्रेंडली मूर्तींच्या विक्रीसाठी व नागरिकांनी खरेदी करावी यासाठी प्रयत्न केले.

**अग्नी :** या घटकात मनपाने शहरात एलईडी स्ट्रीट लाईट लावण्याचे काम केले. शहरात विविध ठिकाणी सोलार प्लांट लावले. खाजगी तत्त्वावर घरांवर सोलर बसवण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच सार्वजनिक इमारतीचे एनर्जी ऑडिट करून त्यावर उपाययोजना केल्या.

**आकाश :** या घटकात मनपाने नागरीकांमध्ये अभियानाची माहिती पोहोचण्यासाठी स्पर्धा, कार्यक्रम आयोजित करून जनजागृती केली. शहर हरित करण्यासाठी नागरिकांना व विद्यार्थ्यांना हरित शपथ दिली. शहरातील पर्यावरण प्रेमी व्यक्तींची पर्यावरण दूत म्हणून निवड करून विविध कार्यक्रमाद्वारे व त्यांच्या सहभागाने शहरात जनजागृती करत अभियानाचे उद्दिष्ट पूर्ण केले. या सर्व उपाययोजांमुळे महानगरपालिकेला या वर्षीही पुरस्कार मिळाला आहे.


अरुणाचल प्रदेश येथे २२ वी राष्ट्रीय सायकलिंग चॉंपियनशिप स्पर्धेत दरमदार कामगिरी करणारे महाराष्ट्राचे खेळाडू.

# राष्ट्रीय सायकलिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्राची दमदार कामगिरी

**८ सुवर्ण, २ रजत आणि ३ कांस्य अशी १३ पदकांची कमाई**

नगर – लोअर दीबांग व्हॅली, रोईंग, अरुणाचल प्रदेश येथे १२ ते १५ फेब्रुवारी दरम्यान सुरू असलेल्या २२ व्या राष्ट्रीय MTB सायकलिंग चाँपियनशिप मध्ये महाराष्ट्र संघाने पदकांची लयलूट करत आपली ताकद सिद्ध केली. देशातील एकूण १७ राज्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून महाराष्ट्राच्या २९ खेळाडूंचा संघ विविध वयोगटांत उतरला होता.

महाराष्ट्राने एकूण ८ सुवर्ण, २ रजत आणि ३ कांस्य अशी एकूण १३ पदकांची कमाई केली. १८ वर्षांखालील गटातील टाइम ट्रायल प्रकारात कु. तनुजा बागुल हिने कांस्य पदक पटकावले, तर याच गटात कु. योगेश सोनवणे याने सुवर्ण पदक जिंकत महाराष्ट्राच्या पदक खात्याची सुरुवात केली.

महिला खुल्या गटात प्रणिता सोमण हिने २ रजत पदक मिळवले, तर मनाली रत्नोजी हिने कांस्य पदक पटकावले. 'साखळी टाइम ट्रायल' या सांघिक प्रकारात महाराष्ट्राच्या संघाने सुवर्ण पदक जिंकत विशेष यश संपादन केले. या विजयी संघात विठ्ठल भोसले (पुणे), हर्षद पाटील (कोल्हापूर), योगेश सोनवणे (नाशिक), प्रणिता सोमण (अहिल्यानगर), मनाली रत्नोजी (पुणे) आणि तनुजा बागुल (नाशिक) यांचा समावेश होता.

डाऊन हिल प्रकारात पुरुष गटात विरेंद्र माळी (पुणे) याने रजत पदक, तर महिला गटात आसावरी काळे (पुणे) हिने सुवर्ण पदक पटकावले. विविध वयोगटांत (१४, १६, १८, २३ व खुला गट) महाराष्ट्राने उल्लेखनीय कामगिरी करत मुला आणि मुली दोन्ही गटांत 'रनर अप' स्थान मिळवले. तसेच 'ओव्हर ऑल चॅम्पियनशिप'मध्येही महाराष्ट्र संघाने 'रनर अप' चषक पटकावला. संघाचे प्रशिक्षक बिरू भोजने आणि यशोधरा शेरकर यांनी खेळाडूंना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. पांडुरंग भोजने यांनी मेकॅनिकल सहाय्यक म्हणून तर प्रवीण वाघमारे यांनी टीम मॅनेजर म्हणून जबाबदारी सांभाळली.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष ॲड. विक्रम रोठे, मानद सचिव प्रा. संजय साठे, उपाध्यक्ष अविनाश कदम, यशवंत नडगम, विजय जाधव, प्रा. साईनाथ थोरात, अभिजित मोहिते, दिपाली पाटील तसेच खजिनदार भिकन आंबे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'सीए प्रिमीयर लीग क्रेझी क्रिकेट स्पर्धेत' के ॲण्ड एम चॅलेंजर्स संघ ठरला अजिंक्य



नगर – अहिल्यानगर सीए शाखेने अहमदनगर क्लबच्या मैदानावर १३, १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या सीए क्रिकेट प्रिमीयर लीग २०२६ या क्रेझी क्रिकेट स्पर्धेत के ॲण्ड एम चॅलेंजर्स हा संघ अजिंक्य ठरला. अंतिम सामन्यात त्यांची लढत चेअरमन जायंट या संघाशी झाली. अंतिम सामन्यामध्ये सामनावीर म्हणून सीए शशांक बंग तर मालिकावीर म्हणून सीए सार्थक भंडारी यांची निवड करण्यात आली.

आठ संघांमध्ये झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन १३ फेब्रुवारी रोजी सीए अशोक गुर्जर, कोटक महिंद्रा बँकेचे अधिकारी अमोल कुलकर्णी, अनिकेत खेडकर तसेच कन्हैया ग्रुप व कन्हैया अग्रोचे सुरेश पठारे, मच्छिंद्र लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष सीए मिलिंद जांगडा, सीए सुशील जैन, सीए सनित मुथ्था, सीए किरण मणियार उपस्थित होते.

सदर स्पर्धेच्या आयोजनाचे नगर सीए शाखेचे हे दहावे वर्ष होते. सीए सभासद व विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. आठ संघ चालक लिलाव पद्धतीने आपल्या संघाच्या खेळाडूंची निवड करतात. विजेत्या कानकिया आणि मेहता संघाचे चालक सीए अभयकुमार कटारिया, सीए सुशील जैन व सीए महेश भळगट तर कर्णधार सीए शशांक बंग होते. उपविजेत्या संघाचे चालक सीए सार्थक भंडारी व स्मरण जांगडा होते. नगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष सीए सनित मुथ्था यांचे अथक परिश्रम व नेटके नियोजन यामुळे स्पर्धेला उत्फूर्त प्रतिसाद मिळून स्पर्धा मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली.

यावर्षी महिला सीए व विद्यार्थिनीचाही या स्पर्धेमध्ये सहभाग होता.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण १५ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रायोजक कोटक महिंद्रा बँक, सह प्रायोजक कन्हैया ग्रुप, कन्हैया अग्रो, फुडिया तसेच नगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, सचिव सीए महेश तिवारी, खजिनदार सीए महेश तिवारी, सदस्य सीए सुनन्दा रच्चा व सीए काजल चंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्पर्धेचे इतर निकाल पुढीलप्रमाणे** : उत्कृष्ट फलंदाज मिहीर बोरा, उत्कृष्ट गोलंदाज संकेत वाणी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सीए ऋतिक गादिया., स्पर्धेसाठी पंच म्हणून चैतन्य खोलगडे व सोहेल पठाण यांनी काम पहिले.


महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतील दिव्यांग बांधवांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. ३ कि.मी., ५ कि.मी. आणि १० कि.मी. अशा तीन गटांमध्ये ही धाव स्पर्धा पार पडली.

# पुणे येथे 'रन इनसिंक २.०' मॅरेथॉनला प्रतिसाद; 'अनामप्रेम' च्या 'दिव्यांग विद्यार्थ्यांची' कामगिरी

नगर – Adventures Beyond Barriers Foundation यांच्या वतीने पुण्यातील युनिव्हर्सिटी ग्राउंडवर "Run InSync 2.0' या भारतातील सर्वात मोठ्या समावेशक धाव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. समानता, समावेशकता आणि 'क्षमता हीच ओळख' या संदेशाला अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाला राज्यासह देशभरातून प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतील दिव्यांग बांधवांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. ३ कि.मी., ५ कि.मी. आणि १० कि.मी. अशा तीन गटांमध्ये ही धाव स्पर्धा पार पडली. विशेष म्हणजे, अनामप्रेम संस्थेच्या अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी बजावली.

स्पर्धेत सहभागी झालेल्या अनामप्रेमच्या खालील कार्यकर्ते व विद्यार्थ्यांना पदकांनी सन्मानित करण्यात आले. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे उपस्थितांनी कौतुक केले. या यशामुळे इतर दिव्यांग विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्याची प्रेरणा मिळणार आहे.

पदक विजेते कार्यकर्ते व विद्यार्थी यामध्ये अजय धोपावकर, आनंद माळवे, राहुल खिरोडे, सुरेखा राठोड, रामदास काकडे, अक्षय राऊत, ऋषिकेश पाटील, आनंद हलकडे, अजय गवळी, श्रीनिवास परिहार, कल्लेश्वर लोहार, अविनाश कोळेकर, किशोर भेंडाळे, गौरव घाडगे, कुणाल माने, स्वाती गारुडे, रेश्मा गुंडेवार, स्नेहा कोळी, ओमकार सोनकर आणि आशिष पोकळे यांचा समावेश आहे. या सर्वांचे अनामप्रेमचे अध्यक्ष इंजि. अजित माने, सचिव अनिल गावडे, संचालक अभय रायकवाड व डॉ. मेघना मराठे यांनी अभिनंदन केले.

# पंच महादेव दर्शन यात्रेने सुखावले शिवभक्त


महाशिवरात्री उत्सवात रात्रीचे महत्त्व विचारात घेऊन याही वर्षी ट्रेकॅम्प धरोहरतर्फे पंचमहादेव दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

**महाशिवरात्रीनिमित्त 'ट्रेकॅम्प-धरोहर'चा सलग दुसऱ्या वर्षी उपक्रम**

नगर – महाशिवरात्री उत्सवात रात्रीचे महत्त्व विचारात घेऊन याही वर्षी ट्रेकॅम्प धरोहरने पंचमहादेव दर्शन यात्रेचे आयोजन केले होते. भल्या पहाटेच बेलेश्वर, शुक्लेश्वर, रामेश्वर, सिद्धेश्वर, घटेश्वर या शिवालयांत भक्तिभावात दर्शन झाल्याने यात्रेतील शिवभक्त कमालीचे सुखावून गेले.

ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून महाशिवरात्रीनिमित्त 'ट्रेकॅम्प-धरोहर'ने पंचमहादेव दर्शन यात्रेचे आयोजन केले होतो. महाशिवरात्रीच्या रात्री साडेबारा वाजता या दर्शन यात्रेचा प्रारंभ झाला. जवळपास ५० नगरकरांनी या यात्रेमध्ये सहभाग नोंदवला. एक वाजता सर्वजण नगर शहराजवळील बेलेश्वर महादेव मंदिराला पोहोचलो. एवढ्या रात्रीसुद्धा तेथ आरतीसाठी सर्व वयोगटातील भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. बेलेश्वर मंदिराचे व्यवस्थापन आणि महादेवाचा अर्धनारी नटेश्वर रूपात केलेला शृंगार खरोखरच मंत्रमुग्ध करणारा होता. आरतीनंतर प्रसाद म्हणून दुधाचे वाटप करण्यात आले. बेलेश्वर मंदिराचे दर्शन घेऊन सर्वजण भिंगारमधील शुक्लेश्वर महादेव मंदिरात पोहोचले. या ठिकाणी सर्वांचे दर्शन अवघ्या दहा मिनिटांत झाले. मंदिराच्या आवारातच मंदिर व्यवस्थापनाने गुळाच्या चहाची व्यवस्था केली होती. त्याचा आस्वाद घेऊन सर्वजण प्रवरासंगमकडे रवाना झाले.

प्रवरा संगमला आम्ही पहाटे साडेचार वाजता पोहोचलो. सर्वप्रथम पुरातन रामेश्वर मंदिराचे दर्शन आम्ही घेतले. पहाटेचे प्रसन्न वातावरण आणि सभामंडपात सजवलेली फुलांची मोठी रांगोळी येथील आकर्षण ठरत होते. रामेश्वर मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर सर्वजण कायगाव टोके येथील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी गेलो. सिद्धेश्वर मंदिरात पहाटे साडेपाच वाजता तेथे पोहोचलो. तेथील शिवलिंगावर प्रसन्न वातावरणात अभिषेक सुरू होता. या ठिकाणी सर्वांनी शिवस्तोत्रांचे पठण केले. काही काळ ओम नमःशिवाय या पंचाक्षरी मंत्राचे ध्यान केले. नंतर सर्वजण यात्रेतील शेवटच्या महादेव मंदिराचे दर्शन करण्यासाठी निघाले. सकाळी सात वाजता सर्व भाविक प्रवरा संगमावर श्री घटेश्वर महादेव मंदिरात पोहोचले. जुनी दगडी बांधकाम आणि विशाल शिवलिंग हे या मंदिराचे वैशिष्ट्य. पाचही मंदिरांचे अतिशय सुंदर दर्शन केल्यानंतर यात्रेत सहभागी सर्व भक्तांच्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसत होते. अमृता बेडेकर यांनी एक छान भक्ती गीत सादर करून वातावरण अधिक भक्तिमय केले. करिष्मा कोठारी जोशी यांनी महादेवास नृत्य साधना अर्पण करून यात्रेची सांगता केली.

मेघा लाहोटी, मनीष कुलकर्णी, पिपिलीकेश्वर जाधव, राधिका लाहोटी यांनी सर्वांसाठी उपवासाची खिचडी आणि चहाची व्यवस्था केली. या यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक करिश्मा कोठारी जोशी यांनी मेहनत घेतली.

महाशिवरात्री उत्सवात रात्रीच्या वेळेला महत्त्व असते. त्यामुळेच पंचमहादेव दर्शन यात्रेचे प्रारंभ रात्री साडेबारा वाजता केला. नगरजवळील बेलेश्वर, शुक्लेश्वर, तसेच प्रवरासंगम व कायगाव टोके येथील रामेश्वर, सिद्धेश्वर, घटेश्वर या मंदिरांत जाऊन दर्शन घेतल्याने भाविक समाधानी झाले. दरवर्षी या यात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे, असे ट्रेकॅम्प-धरोहरचे संस्थापक विशाल लाहोटी यांनी सांगितले.

# तंदुरुस्त अहिल्यानगरसाठी मैदानी खेळ महत्त्वाचे : क्रीडा शिक्षक संजय धोपावकर

### एसा स्पोर्ट्स विक २०२६ चा समारोप

नगर – तंदुरुस्त अहिल्यानगरसाठी मैदानी खेळ अत्यावश्यक आहेत. खेळामधून केवळ शरीर नव्हे तर मनही बळकट होते. 'खेळो भारत' या शासनाच्या उपक्रमामुळे तरुणांना आता क्रीडाक्षेत्रात करिअर घडवण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे, असे प्रतिपादन प्रा. संजय धोपावकर यांनी केले. ते पुढे म्हणाले की, संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास या खेळांमधून विकसित होतात. प्रत्येकाने दररोज काही काळ मैदानी खेळासाठी राखावा.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एसा स्पोर्ट्स विक २०२६ चा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या समारंभाला आमदार संग्राम जगताप, क्रीडा मार्गदर्शक आणि सारडा कॉलेजचे माजी स्पोर्ट्स डायरेक्टर प्रा. संजय धोपावकर, तसेच पोलाद स्टील जालना चे असि. व्हाइस प्रेसिडेंट आशिष भाबडा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना प्रा. संजय धोपावकर म्हणाले की, तंदुरुस्त अहिल्यानगरसाठी मैदानी खेळ अत्यावश्यक आहेत. खेळामधून केवळ शरीर नव्हे तर मनही बळकट होते. 'खेळो भारत' या शासनाच्या उपक्रमामुळे तरुणांना आता क्रीडाक्षेत्रात करिअर घडवण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. ते पुढे म्हणाले की, संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास या खेळांमधून विकसित होतात. प्रत्येकाने दररोज काही काळ मैदानी खेळासाठी राखावा.

एसा स्पोर्ट्स विकमध्ये आठ खेळांचा समावेश होता – मिनी मॅरेथॉन, चेस, बॅडमिंटन, फुटबॉल, टेबल टेनिस, कॅरम, पिकल बॉल आणि क्रिकेट.

या सर्व स्पर्धांमध्ये सदस्यांनी सहभाग नोंदवला. मिनी मॅरेथॉन: उदित हिरे – प्रथम, वैभव निमसे – द्वितीय, अमोल येनगंदुल व सुनिल औटी – संयुक्त तृतीय.


आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एसा स्पोर्ट्स विक २०२६ चा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. (छाया – लहू दळवी)

समन्वयक : अमोल येनगंदुल, गौरव मांडगे. चेस: रोशन गुगळे विजेते, शुभम आगरकर उपविजेते. समन्वयक : अभिजित शिंदे. बॅडमिंटन: अमेय कुलकर्णी यांच्या टीमने विजेतेपद तर दीपक नागोरी यांच्या टीमने उपविजेतेपद पटकावले.

समन्वयक : सुशांत जगताप, अविनाश देवी. फुटबॉल: शुभम आठरे यांच्या टीमने विजेतेपद मिळवले; उदित हिरे यांच्या टीम उपविजेती ठरली.

आयोजन : ओजस नवले, ओमकार म्हसे. टेबल टेनिस: अमेय कुलकर्णी विजेते, वैशाखी हिरे उपविजेती. कॅरम: भूषण पांडव–नितीन कोरडे विजेते, अविनाश देवी–पंकज जहागीरदार उपविजेते. समन्वयक : शैलेश सप्रे, आकिब काझी. पिकल बॉल: प्रथमच झालेल्या या स्पर्धेत प्रदीप तांदळे यांच्या टीम विजेती, आशिष कापसे यांच्या टीम उपविजेती ठरली. क्रिकेट : सीनियर विभाग : अजय दगडे टीम विजेती, अजित माने टीम उपविजेती. मुख्य स्पर्धा : सागर ढगे टीम विजेती, अविनाश देवी टीम उपविजेती.

साखळी सामन्यात प्रल्हाद जोशी, राहुल पांडव, प्रितेश कांकरिया हे सामना मानकरी ठरले, तर फायनलमध्ये आशिष कापसे यांना मॅन ऑफ द मॅच आणि सिरीजमधील सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार मिळाला.

मुख्य अतिथींच्या हस्ते सर्व विजेत्या खेळाडूंना पारितोषिके व ट्रॉफी देण्यात आल्या. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, एसा संस्था दरवर्षी क्रीडा स्पर्धा घेते आणि त्यातून नागरिकांमध्ये आरोग्य-जागरूकता वाढते. ज्यांना या वर्षी यश मिळाले नाही त्यांनी पुढील वर्षी अधिक जोमाने प्रयत्न करावेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप तांदळे यांनी केले. भूषण पांडव यांनी आभार मानले.

संस्थेचे अध्यक्ष अभिजित देवी यांनी सांगितले की, स्पोर्ट्स विक हा संस्थेचा सर्वात मोठा वार्षिक उपक्रम आहे. जवळपास १५० सभासदांनी २० ते ७५ वयोगटात सहभाग घेतला आहे. यामुळे जुन्या आणि नव्या सभासदांमधील दरी कमी होते आणि व्यावसायिक जीवनातील सहकार्याची भावना वाढते.

स्पोर्ट्स कमिटी हेड जितेश सचदेव यांनी सर्व सदस्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले आणि म्हटले की, खेळ म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर एकत्र येऊन नात्यांमध्ये बळकटी आणण्याचा मार्ग आहे.

या समारंभास पोलाद स्टील कंपनीचे सुशांत गव्हाणे, एसा उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, सुनिल औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, संजय चांडवले, सुनिल जाधव, अनमोल जैन, संकेत पादिर, गौरव मांडगे, तसेच झोहेब खान, अनिल मुरकुटे, मकरंद देशपांडे, इक्बाल सय्यद, सुरेश परदेशी, विजय पादिर, शिरीष कुलकर्णी आणि सभासद उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त शहरात 'जय शिवाजी, जय भारत पदयात्रा' उत्साहात

## छत्रपती शिवरायांच्या जयघोषाने अवघे शहर दुमदुमले, हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग, महाराजांच्या जिवंत देखाव्यांनी वेधले लक्ष

नगर – छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती उत्सवानिमित्त जिल्हा प्रशासन आहिल्यानगर, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जय छत्रपती शिवाजी, जय भारत पदयात्रा काढण्यात आली. यात जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शाळा, महाविद्यालयाचे हजारो विद्यार्थी अणि जिल्हा क्रीडा संकुल मधील विविध खेळाच्या प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू सहभागी झाले होते.





छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी महापौर जोती गाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मनपा आयुक्त यशवंत डांगे, प्रांताधिकारी सुधीर पाटील, उपमहापौर धनंजय जाधव, जयंत वाघ, संजीव भोर, सुरेश इथापे आदी, ॲड. अनुराधा आठरे–येवले आदी सहभागी झाले होते. (छाया – लहू दळवी)

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून ही पदयात्रा सुरू झाली. प्रारंभी शिवाजी महाराजांची आरती करण्यात आली. याप्रसंगी यावेळी आमदार संग्राम जगताप, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आयुक्त यशवंत डांगे, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, विशाल गर्जे, प्रविण कोफ्लढावळे, प्रियंका खिंडरे, रमेश जगताप, संतोष वाबळे, जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी ड. विश्वासराव आठरे, मुकेश मुळे, जयंत वाघ, दीपलक्ष्मी म्हसे, बाळासाहेब सागडे, विजयकुमार पोकळे, संजीव भोर, क्रीडा संघटनेचे शैलेश गवळी आदींसह शासनाच्या सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, जिल्हा क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

केंद्रीय युवा कार्यक्रम तथा क्रीडा मंत्रालय व राज्य शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यामंध्ये जय छत्रपती शिवाजी, जय भारत पदयात्रा काढण्यात आली. जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार जिल्हा क्रीडा कार्यालयाचा या पदयात्रेत सहभाग होता. जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पदयात्रेत विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व दांडपट्टा, तलवारबाजी प्रात्यक्षिके नागरिकांची आकर्षण ठरली. पोलीसांच्या बॅण्ड पथकाने सादर केलेले महाराष्ट्र गीत व शाहीरांचे पोवाडे, संबळच्या निनादाने उपस्थितांची मने जिंकली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि विविध महापुरुषांच्या वेशभुषेतील विद्यार्थी, घोड्यावर स्वार शिवाजी महाराज व मावळ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. वाहतुकीचे नियमन व पर्यावरण संवर्धणाचा विद्यार्थ्यांनी संदेश दिला. भगव्या ध्वजांनी सर्व परिसर व्यापला होता. घोड्यांच्या रथात शिवाजी महाराज आणि विविध जिवंत देखाव्यांनी या पदयात्रेची शोभा वाढवली. यामध्ये विविध क्रीडा प्रकारासह लेझीम, दांडपट्टा, तलवारबाजीचे धाडसी प्रात्यक्षिक देखील सादर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा वेस, आशा टॉकीज, कापड बाजार, तेलिखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजामार्गे दिल्लीगेट ते रेसिडेन्सिअल हायस्कूल दरम्यान यात्रेचा समारोप झाला. यामध्ये एकविध जिल्हा क्रीडा संघटना, पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र व विविध खेळ प्रशिक्षण केंद्राचा सहभाग लाभला.

# दीपोत्सवाने शिवजयंतीची दिमाखदार सुरुवात

## जुन्या बसस्थानक परिसरात उजळला शिवरायांचा अश्वारूढ पुतळा; 'जय जिजाऊ, जय शिवराय'च्या घोषणा

नगर – हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १८ फेब्रुवारी रोजी जुने बसस्थानक येथील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर शेकडो पणत्या प्रज्वलित करून त्यांना मानवंदना देण्यात आली. दीपोत्सवाने जयंती उत्सवाची मंगल सुरुवात करण्यात आली. लखलखत्या दिव्यांच्या प्रकाशात उजळलेल्या पुतळ्यामुळे संपूर्ण परिसर शिवभक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला. मराठा सेवा संघ, मराठा समन्वय परिषद आणि जिजाऊ ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक विद्युत रोषणाई आणि पणत्यांच्या तेजस्वी प्रकाशात न्हालेला पुतळा पाहून उपस्थित शिवप्रेमी भारावून गेले. 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'जय शंभूराजे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १८ फेब्रुवारी रोजी जुने बसस्थानक येथील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर शेकडो पणत्या प्रज्वलित करून त्यांना मानवंदना देण्यात आली.

दीपोत्सवात महिला, युवक–युवतींसह विविध वयोगटातील शिवभक्त सहभागी झाले होते. प्रत्येकाच्या हातातील पणती ही शिवरायांप्रती कृतज्ञतेची आणि अभिमानाची भावना व्यक्त करत होती. शिवरायांच्या कार्याची आणि त्यागाची आठवण करून देणारा हा दीपोत्सव उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमास मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा ॲड. स्वाती जाधव, अलकाताई मुंदडा, महापालिकेचे अभियंता श्रीकांत निंबाळकर, आरती बडेकर, वैशाली क्षीरसागर, लीला अग्रवाल, प्रतिभा पेंडसे, रेखा फिरोदिया, रोहिणी पवार, माया हराळ, विजय नवले, इंजि. महेश धाडगे, अमोल लहारे, अभिनव हराळ, संतोष हराळ आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी अनिता काळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवजयंती हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आणि प्रेरणेचा उत्सव आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि संघटनशक्तीचा आदर्श युवकांनी डोळ्यासमोर ठेवावा. व्यसनमुक्त, सशक्त आणि राष्ट्रनिष्ठ तरुणाई घडविणे हीच खरी शिवरायांना अभिवादन करण्याची पद्धत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सुरेश इथापे यांनीही शिवरायांच्या तेजस्वी कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण करून समाजाला सुरक्षिततेचा आणि स्वाभिमानाचा विश्वास दिला. त्यांच्या विचारांमधून आजही एकता, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळते. शिवजयंतीचा उत्सव म्हणजे केवळ साजरा करण्याचा दिवस नसून त्यांच्या आदर्शांचे आचरण करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



तपोवन रोडवरील लिटिल स्कॉलर्स प्री–प्रायमरी स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# लिटिल स्कॉलर्स प्री–प्रायमरी स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

नगर – तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्री–प्रायमरी स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. लहानग्या विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण शाळा परिसर शिवमय झाला होता. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या सौ. संगीता जाधव यांनी प्रास्ताविकाने केली. त्यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे ऐतिहासिक महत्त्व, त्यांचे शौर्य, स्वराज्याची संकल्पना, आदर्श नेतृत्व आणि मूल्याधिष्ठित जीवन याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच जिजाऊं माँसाहेब यांच्या वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांची आरती, जोशपूर्ण 'शिवगर्जना' आणि देशभक्तीपर घोषणांनी कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले. बालवयातच इतिहास, संस्कार आणि देशप्रेमाची बीजे रोवण्याचा हा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष बद्रीनाथ जाधव, गणेश बोरुडे, कुलदीप केंद्रे, छिंदम काका, दिप्ती ढेरे, सौ. स्मिता थोरात, नम्रता गोले, साक्षी भांड, मोनाली बोरुडे व लक्ष्मी कॉलनी परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौरी ढेरे व प्रणव जाधव यांनी परिश्रम घेतले.

# ध्वजसंहितेसारखी महापुरुष संहिता काळाची गरज झाली का ?

भारतामध्ये ध्वजसंहितेत राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी स्पष्ट नियम आखले गेले आहेत. तसेच याच्या अंतर्गत राष्ट्रीय प्रतीकांचा अपमान दंडनीय आहे. परंतु प्रश्न असा आहे की–ज्यांनी राष्ट्र घडवले, स्वराज्य उभे केले, समाजाला दिशा दिली अशा महापुरुषांच्या पुतळे, प्रतिमा आणि विचारांच्या सन्मानासाठी अशी कोणती स्पष्ट संहिता आहे का?

आज विविध शासकीय कार्यक्रम, जयंती उत्सव, राजकीय सभा, जाहिराती, बॅनर, सोशल मीडिया पोस्ट यामध्ये महापुरुषांच्या प्रतिमांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. अनेकदा हे फोटो जमिनीच्या जवळ, जाहिरातींच्या तळाशी, इतर व्यक्तींच्या छायाचित्रांमागे किंवा अयोग्य रचनेत वापरले जातात. काही ठिकाणी पुतळ्यांची स्वच्छता, उंची, प्रकाशयोजना, परिसराची निगा याकडे दुर्लक्ष होते. ही परिस्थिती केवळ दुर्लक्ष नव्हे तर सांस्कृतिक असंवेदनशीलतेचे लक्षण आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांसारखे महापुरुष हे केवळ एका पक्षाचे, एका जातीचे किंवा एका विचारसरणीचे प्रतिनिधी नव्हेत; ते संपूर्ण राष्ट्राचे आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रतिमांचा वापर करताना किमान शिष्टाचार, रचनात्मक निकष आणि सन्मानाचे नियम असणे आवश्यक आहे.

(महाराष्ट्राचे आराध्य दैवत, जाणता राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त)

**महापुरुष संहिता का आवश्यक?** सन्मानाचे स्पष्ट निकष – फोटो/प्रतिमा जमिनीवर, पायाजवळ, जाहिरातींच्या तळाशी किंवा अपमानास्पद संदर्भात वापरू नयेत.

**प्रमाणबद्धता व स्थान –** शासकीय कार्यक्रमात प्रतिमा प्रमुख व स्पष्ट दिसेल अशा उंचीवर व मध्यवर्ती स्थानी असावी.

**पुतळ्यांची निगा –** स्वच्छता, प्रकाशयोजना, माहितीफलक, परिसराची देखभाल यासाठी मानक मार्गदर्शक तत्त्वे असावीत.

**राजकीय गैरवापर टाळणे –** महापुरुषांच्या प्रतिमा केवळ मतप्रचारासाठी वापरण्यावर मर्यादा असाव्यात.

**सामाजिक ऐक्य –** महापुरुषांना जात–धर्माच्या चौकटीत बंदिस्त करणारे विधान किंवा सादरीकरण टाळण्यासाठी स्पष्ट दिशानिर्देश असावेत.

आज ध्वजाचा अपमान कायद्याने दंडनीय आहे; परंतु महापुरुषांच्या विचारांचा अवमान, प्रतिमांचा अविचारी वापर किंवा संकुचित चौकटीत बंदिस्ती याबाबत स्पष्ट राष्ट्रीय धोरण नाही. परिणामी वाद, भावना दुखावणे आणि सामाजिक तणाव वाढतो.

**सर्वसमावेशक दृष्टिकोनाची गरज –** महापुरुष हे काळाच्या पलीकडचे असतात. त्यांचे कार्य संपूर्ण समाजासाठी असते. त्यांना एका गटापुरते मर्यादित करणे म्हणजे त्यांच्या व्यापक योगदानाचा अवमान होय. महापुरुष संहिता ही कोणावर बंधने घालण्यासाठी नव्हे, तर सामूहिक सन्मानाची हमी देण्यासाठी असावी.

केंद्र व राज्य शासनांनी तज्ज्ञ समिती स्थापन करून सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत. स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यानुसार नियमावली तयार करणे बंधनकारक करावे. शाळा–महाविद्यालयांमध्येही याबाबत जनजागृती व्हावी.

राष्ट्रध्वजाला जसा मान आहे, तसाच राष्ट्रघडवणाऱ्या महापुरुषांनाही असायला हवा. सन्मान ही भावना असली तरी त्यासाठी नियमांची चौकट असणे हीच सुजाण लोकशाहीची खूण आहे. https://x.com/i/status/1896460889349648419

**– शेख शहाजान फकीर,** मो. ८३२९६१७३४३, अहिल्यानगर.

# केडगावच्या भैरवनाथ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा ३५ वा वर्धापन दिन उत्साहात

केडगाव – भैरवनाथ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., केडगाव (अ. नगर) या संस्थेचा ३५ वा वर्धापन दिन १४ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सन १४ फेब्रुवारी १९९१ रोजी संस्थापक भानुदास एकनाथ कोतकर यांनी श्री भैरवनाथ व आई जगदंबेच्या आशीर्वादाने केडगावच्या पवित्र मातीत एका छोट्याशा रोपट्याची स्थापना केली होती. आज त्या रोपट्याचे ३५ वर्षांत भक्कम वटवृक्षात रूपांतर झाले असून संस्था ३६ व्या वर्षात यशस्वीपणे पदार्पण करत आहे. छोट्या रोपट्यापासून भक्कम वटवृक्षापर्यंतचा प्रवास स्थापनेच्या प्रारंभी मर्यादित साधनसामग्री आणि अल्प भांडवल असतानाही संस्थेने प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि विश्वास या तत्त्वांवर कार्य सुरू ठेवले. केडगाव लोकवस्तीतील छोटे व्यापारी, मोठे व्यावसायिक तसेच अल्पभूधारक शेतकरी वर्ग यांच्या सक्रिय सहकार्यामुळे संस्थेची आर्थिक घडी अधिक मजबूत होत गेली.



केडगाव येथील भैरवनाथ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. च्या ३५ व्या वर्धापन दिनी संस्थापक भानुदास कोतकर यांनी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

संस्थापक, चेअरमन, सचिव व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आजी–माजी कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे संस्था सातत्याने प्रगतीपथावर राहिली आहे. सभासदांच्या विश्वासाचा पाया गेल्या तीन दशकांहून अधिक काळात संस्थेने सभासदांना विविध कर्ज योजना, बचत योजना व आर्थिक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. ग्रामीण भागातील व्यावसायिक व शेतकरी वर्गासाठी विश्वासार्ह आर्थिक आधार म्हणून पतसंस्थेची ओळख निर्माण झाली आहे.

संस्थेच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता, वेळेवर सेवा व सभासदांशी जपलेले जिव्हाळ्याचे नाते हेच यशाचे गमक ठरले आहे.

### ३६ व्या वर्षात दमदार पदार्पण

३५ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण करताना संस्थेने पुढील काळात अधिक आधुनिक सेवा, डिजिटल व्यवहार सुलभता व ग्रामीण भागाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नवे उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

यावेळी संस्थेच्या वतीने सभासद, ठेवीदार, कर्जदार, कर्मचारी व हितचिंतक यांचे आभार मानण्यात आले.

# शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला मिळाली नवदृष्टी, ज्येष्ठ नागरिकांनी केला महाराजांचा जयघोष

## फिनिक्सच्या शिबिराद्वारे ६३ ज्येष्ठ नागरिकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वी

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शिबिराच्या माध्यमातून ६३ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाली. पुणे येथे मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होवून ज्येष्ठ नागरिक शिवजयंतीच्या पूर्व संध्येला शहरात परतले.



दृष्टीदोष असलेल्या गरजू घटकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेने त्यांना नवदृष्टी देऊन शिवजयंती साजरी करण्यात आली.

शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवाजी महाराजांचा एकच जय घोष करण्यात आला. फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले. आगळ्या–वेगळ्या पध्दतीने दृष्टीदोष असलेल्या गरजू घटकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेने त्यांना नवदृष्टी देऊन शिवजयंती साजरी करण्यात आली. शस्त्रक्रिया झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी जिल्ह्यात फिनिक्स फाऊंडेशनने मोठी चळवळ उभी केली आहे. दरवर्षी शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर फिनिक्सच्या माध्यमातून शिबिर घेऊन गरजूंवर पुणे येथील के.के. आय बुधराणी मध्ये मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहे. आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी हे शिबिर आधार ठरत असल्याचे जालिंदर बोरुडे यांनी सांगितले. दर महिन्याला गरजू रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले जाते.

या शिबीराच्या माध्यमातून नेत्रदान व अवयवदानाची देखील जनजागृती सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

# घरात घुसून महिलेला शिवीगाळ करत धक्काबुक्की

नगर – नागरदेवळे परिसरात एका अनोळखी इसमाने घरात अनधिकृतपणे प्रवेश करून महिलेला शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याची घटना १८ फेब्रुवारीला दुपारी ४.३० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेलार मळा रोडवरील दत्त कॉलनी येथे अमोल रत्नाकर गायकवाड यांचे निवासस्थान आहे. १८ फेब्रुवारीला दुपारी ४.३० च्या सुमारास एक अनोळखी पुरुष फिर्यादीच्या घरात अचानक शिरला. यावेळी घरात उपस्थित असलेल्या एका महिलेला आरोपीने विनाकारण अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादावादी वाढल्यानंतर आरोपीने संबंधित महिलेला धक्काबुक्की करून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि तिथून पळ काढला. या घटनेनंतर अमोल गायकवाड यांनी तातडीने भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३, ११५(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार एम. एम. भेटे करत आहेत. दिवसाढवळ्या घरात शिरून झालेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# नगर शहरात २० फेब्रुवारी रोजी स्वान आर्ट फाऊंडेशनच्यावतीने 'आठवणीत गुंफणारा मेलडी डेझ...आओ जी ले फिरसे!' कार्यक्रम

नगर – स्वान आर्ट फाऊंडेशनच्यावतीने माऊली सभागृह, झोपडी कॅन्टींग, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.४५ वाजता 'आठवणीत गुंफणारा मेलडी डेझ.... आओ जी ले फिरसे !' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या विषयाला अनुसरून लाईव्ह पेंटिंग केले जाणार आहे. त्याची सभागृहातच विक्री केली जाणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी मोफत आहे. पासेससाठी पलख ज्वेलर्स, जुना कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, अहिल्यानगर आणि हॉटेल नगरी व्हिलेज, जाधव नगर, नगर – मनमाड रोड, सावेडी अहिल्यानगर येथे उपलब्ध आहेत. लेखन, दिग्दर्शन उन्मेष शहाणे निर्मिती: सुवर्णा शहाणे, संकल्पना: सद्य परिस्थिती संगीत: अविनाश इनामदार प्रमुख गायिका: अपूर्वा शहाणे गायक: उन्मेष शहाणे, अथर्व शहाणे संवाद: डॉ. जतीन काजळे – उन्मेष शहाणे लाईव्ह पेंटिंग: सौ. दर्शना धुमाळ बासरी: जयेश कुलकर्णी लाईट: गणेश लिमकर, कुणाल परदेशी साउंड: राजू ढोरे व्हिज्युअल्स: के. आर्या व्यंगचित्रे: उन्मेष शहाणे यांचे असणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

